नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



युगवाणी

संपादक

विदर्भ साहित्य संघ
मुखपत्र

मार्च १९५

★

या अंकांत —

आचार्य धर्माधिकारी

पु. य. देशपांडे

प्रभाकर माचवे

मधुकर मंगरूळकर

नारायण गणेशपूरकर

ना. मा. सरपटवार

कांति बुधे

शकुंतला दिवाणजी

वि. सा. संघ—

१) परीक्षांचे निका

२) अहवाल

★

वर्ष ५ वें अंक

किंमत आठ आ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

विदर्भ साहित्यसंघाच्या १९५० सालासाठी अध्यक्ष व कार्यकारी मंडळाच्या सभासदाची वार्षिक निवडणूक दिनांक १४ जानेवारी रोजी होऊन खालील सभासद रीतसर निवडून आले.

अध्यक्ष

श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर

कार्यकारी मंडळ.

न्या. मू. के. टी. मंगळमूर्ति.
डॉ. यशवंत खुशाल देशपांडे.
प्रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी.
श्री. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे.
डॉ. माधव गोपाळ देशमुख.
प्रिं. हरि नारायण नेने.
डॉ. विष्णु भिकाजी कोलते.
प्रा. वामन कृष्ण चोरघडे.
श्री. द. रा. गोमकाळे.
श्री. रा. पु. सगदेव.
श्री. प्र. ना. खोंडे.
प्रा. भवानीशंकर पंडित.
श्री. शकुंतलाबाई दिवाणजी.
श्री. शंकर नारायण सहस्रबुद्धे.

वि. सा. संघ.
२९-१-५०

—शं. ना. सहस्रबुद्धे
सरचिटणीस.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
युगवाणी कार्यालय, वझलवार कॉलनी, धरमपेठ, नागपूर.

मुद्रक, प्रकाशक : प. वि. बेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क्षमस्व

या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत पुष्कळच सुट्या आल्याने प्रेसमध्ये युगवाणीची छपाई अंक वेळेवर निघावा म्हणून रात्रंदिवस घाईघाईने करावी लागली. त्यामुळे मुद्रणदोष राहून गेले. कांही ठळक चुका खाली दिल्या आहेत. त्याप्रमाणे वाचकांनी दुरुस्ती करून घ्यावी अशी विनंति आहे:—संपादक.

पृ. ५४ 'भाषाध्यन'च्या जागीं "भाषाध्ययन"

पृ. ५५—शीर्षक 'श्रद्धांजलि' चुकून पडलें आहे. त्याऐवजी "कल्पनाच भीषण आहे" असें शीर्षक हवें.

पृ. ५९ शीर्षकांमध्ये—"विधिघटित" असें हवें.

पृ. ५९ खालून दुसरी ओळ "सद्गति" असा उडालेला शब्द आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांत व वऱ्हाड शाळाखात्याकडून लायब्ररींसाठी मंजुरी मिळालेलें

वर्ष पांचवें] युगवाणी [अंक तिसरा
मार्च १९५०

वार्षिक वर्गणी पांच रु. :: सभासदांना फक्त तीन रु.

संपादकीय—

विदर्भ साहित्य संघाचें चांदा येथील महत्त्वपूर्ण अधिवेशन आटोपल्यानंतरचा हा अंक आहे. या अधिवेशनांत महत्त्वाचे जे ठराव पास झाले ते संघवार्तेंत दिले आहेत. या वर्षीच्या संघाच्या कार्याची दिशा मंदिर उभारणी, संघाचे एक हजार सभासद करणें आणि 'युगवाणी'ची कायम व्यवस्था करणें ही प्रामुख्यानें आहे. त्या दृष्टीने जोराचें कार्य सुरू आहे. साहित्य संघाच्या एक हजार सभासदांच्या संकल्पापैकी आज ता. २८ पर्यंत 'युगवाणी' कार्यालयांत नोंदलेल्या सभासदांची संख्या तीनशे एक आहे. त्यांत १७ सभासद तहाहयात आहेत. या एक महिन्यांत सौ. सरस्वतीबाई महाजनी, सौ. विमलाबाई देशपांडे, श्री. रा. पु. सगदेव, श्री. बाळासाहेब दवळे, (संपादक, महाराष्ट्र), श्री. गोविंदराव श्रीगिरीवार व शेट खुशालचंद खजांची हे तहाहयात सभासद झाले आहेत. आगखी अभिवचनें मिळालीं आहेत. मागील संबंध वर्षांत विदर्भ साहित्य संघाच्या एकुण सभासदांची संख्या अवघी १८२ होती. यावर्षी केवळ दोन महिन्यांतील वर दिलेला आंकडा हा उत्साहजनक आहे हें वाचक ओळखतीलच. जुन्या सदस्यांपैकी नागपूर—९, अमरावती—३६, वऱ्हाड—१० व इतर गांवें—३४ येवढे सभासद पुन्हा नवीन वर्षासाठी व्हावयाचे राहिले आहेत. त्या सभासदांकडे या महिन्याचा अंक पाठविला जात आहे. त्यांनी कृपाकरून वर्गणी 'युगवाणी' कार्यालयाकडेच परस्पर पाठवावी अशी त्यांना जाहीर विनंती आहे. सभासद नोंदणीच्या कामीं कार्यकारी मंडळाव्यतिरिक्त सौ. इंदुमती शेवडे एम्. ए, नागपूर; डॉ. यशवंत त्र्यंबक गद्रे, वर्धा; श्री. ना. रा. शेंडे, नागपूर श्री. म. श्री. मंगरूळकर नागपूर, यांची फार मदत होत आहे. सर्व मराठी भाषा बोलणाऱ्या मंडळींचें हें कार्य असल्यामुळे सर्वांना मदतीचें आवाहन आहे.

विदर्भ साहित्य संघाच्या चांदा अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. मा. गो. देशमुख यांचें एक तांतडीचें पत्र आलें. त्यांत त्यांनी एक खुलासा करावयास सांगितलें आहे. वृत्तपत्रांतून चांद्याला अध्यक्षांची गैरसोय झाली असें आलें आहे. तें चूक आहे. चांद्याला स्वागताच्या बाबतींत उणीव भासली नाही. छोट्या मोठ्या गैरसोयी ह्या मेळाव्यांत होतच असतात. महत्त्व खाण्या-पिण्याचें नसतें; अंतःकरण पहावयाचें असतें. त्या दृष्टीने कुणाचीहि गैरसोय झाली नाही. हें डॉ. माधवराव देशमुख व कार्यकारी मंडळाचा सदस्य या नात्याने मी जाहीर करूं इच्छितों.

पुढील अंकापासून तीन सदरें नियमित सुरू करावयाचीं आहेत. १. मध्यप्रदेश साहित्य वार्ता २. मध्यप्रदेश संशोधन वार्ता ३. वाणी विलास. यास्तव मराठी संशोधकांना व प्रकाशकांना तसेंच लेखकांना आमची विनंती अशी की त्यांनी आपापल्या कार्याची माहिती 'युगवाणी' कडे पाठवावी. लेखक, प्रकाशकांनी पाठविलेल्या पुस्तकांचें नांव, लेखक, प्रकाशकाचें नांव, पत्ता छापखाना किंमत इ. बद्दल माहिती सविस्तर कळवावी.

मध्यप्रांतांत वाचनालयें, शाळा, महाविद्यालयें कितीतरी आहेत. त्यांनी किंचित् मनावर घेतल्यास संघाच्या मागे मोठी शक्ति उभी राहूं शकते व 'युगवाणी' ला आधार मिळून तिची प्रगति साधूं शकते. यास्तव सामान्येकरून सर्वांना व विशेषकरून उपरोक्त संस्थांच्या कार्यकर्त्यांना विदर्भ साहित्य संघाचे सभासद होण्यास जाहीर विनंती करीत आहे.

२८-२-१९५० वामन कृष्ण चोरघडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्य दृष्टि

आचार्य शं. त्र्यं. धर्माधिकारी

☆

गरीबी व श्रीमंती मनुष्यनिर्मित नसून ईश्वरनिर्मित आहेत असा जुन्या नीतिशास्त्राचा संकेत होता. तें पूर्वकर्माचें फळ आहे असें हिन्दूने मानावें, तकदीर आहे असें मुसलमानाने समजावें, आणि 'देशांतून गरीब नाहींसे होणें शक्य नाहीं' (The poor shall never cease from out of the land) या वचनावर खिस्त्यांनी श्रद्धा ठेवावी. पूर्वीच्या नीतिशास्त्रज्ञांनी 'प्रामाणिकपणाने श्रीमंत व्हा किंवा समाधानाने गरिबींत रहा' (Be honestly rich or contentedly poor) असाच उपदेश केला. धर्म व नीति ह्यांची अशी शिकवण असल्यामुळे गरिबांनी श्रीमंतांचा हेवा करूं नये आणि श्रीमंतांनी गरिबांवर दया करावी हेंच सुसंस्कृत जीवनाचें लक्षण मानलें जात असे. गरिबांविषयीं कळवळा व कींव उत्पन्न करणें हाच साहित्याचा उदात्त हेतु असे. दीनांविषयी करुणा, अनुकम्पा जागृत करणारीं काव्यें, नाटकें व लेख उत्कृष्ट समजले जात. गरीबी व श्रीमंती कधीच नाहींशी होणें शक्य नसल्यामुळे श्रीमंतांनी दान करून गरिबांच्या यातनांची तीव्रता कमी करावी यांतच श्रीमंतांची थोरवी होती.

पण आता वैचारिक भूमिकेंत क्रांतिकारक बदल झालेला आहे. गरीब–श्रीमंत हा भेद स्वाभाविक किंवा देवनिर्मित नसून औपाधिक व मानवकृत आहे या विषयी आता वाद राहिलेला नाही. म्हणून आता गरिबांच्या मनांत दया-याचना किंवा कृपाकांक्षिता उत्पन्न करण्याऐवजी तीव्र असंतोष, आत्मप्रत्यय व प्रतिकारशक्ति जागृत करणें साहित्याचा हेतु असला पाहिजे. श्रीमंतांच्या मनांतहि करुणा किंवा अनुकंपा उत्पन्न करण्याऐवजी सहानुभूति व अनुताप जागृत करून उपरति आणि आत्मविसर्जनाची वृत्ति निर्माण केली पाहिजे.

सत्ता, मत्ता व मान्यता या तिन्ही सामाजिक प्रतिष्ठांना मुकलेलीं माणसें माणुसकीलाच पारखीं होतात. त्यांना नीतीची चाड नसते, लौकिकाची दरकार नसते, पापपुण्याची पर्वा नसते, किंबहुना त्यांना तीं कळतहि नाहीत. समाजांतील सभ्यतेचे नियम प्रतिष्ठित वर्गांतील व्यक्तींच्या परस्परांतील व्यवहारापुरतेच अमलांत येतात. अप्रतिष्ठित वर्गांतील व्यक्तींशी वागतांना संभावित माणसें देखील त्या नियमांचें पालन न करणेंच प्रतिष्ठितपणाचें लक्षण मानतात, याचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुभव या अप्रतिष्ठित वर्गाला प्रत्यहीं येतो. म्हणून त्या वर्गाला संभावितीची व संभावितांची कदर वाटत नाही.

एकंदरीत दोन्ही वर्गांच्या लोकांच्या हृदयावर व मेंदूवर त्यांच्या 'पोटा'चाच परिणाम झालेला दिसतो. भुकेलेल्याच्या कल्पवृक्षाला स्वादिष्ट व पौष्टिक खाद्य-पदार्थ लागतील, तर जो धनमाज झाला असेल त्याच्या कल्पवृक्षाला मोत्यें व माणकें लागतील. एकाचें अन्न हेंच परब्रह्म असतें तर दुसऱ्याचें ब्रह्मज्ञान 'तत्त्वमसि'वर आधारलेलें असतें. सम्पन्न वर्गाच्या ठिकाणीं जी नैतिकता व सभ्यता भासते ती देखील नकली व तकलुपी असते, 'कल्चर'ची म्हणजे 'कमावलेली' देखील नसते. एवंच काय, की ज्याला आपण सद्गुण किंवा शील म्हणतों तें दरिद्र्याला परवडत नाही आणि श्रीमंताला किफायतशीर होतें तोंपर्यंतच मानवतें. एका निराळ्याच अर्थाने आजच्या धनसत्तात्मक युगाला ' सर्वे गुणा: कांचनमाश्रयन्ते ' हें वचन लागूं होतें.

नाइलाजांत, असहायतेंत समाधान मानल्याने नीतीचा किंवा माणुसकीचा विकास होऊं शकतो असें कुणालाच दाखवून देतां येणार नाही. सामाजिक परिस्थितीमुळे आजहि कित्येक लोकांना चाण्डालाचा धंदा पत्करून स्मशानांतच आयुष्य कंठावें लागतें. प्रेतावरील कापड वापरणें त्यांच्या अंगवळणीं पडलेलें असतें, चितेवर पानगे भाजतांना त्यांना खरोखरच दिक्कत वाटत नाहीं, प्रेताच्या टाळू-वरील लोणीहि त्या पानग्यांना लावतांना त्यांना कांहीच वाटणार नाही. अशा लोकांनी आपल्या वांट्याला आलेल्या या जीवनक्रमांत समाधान मानणें योग्य होईल कां ? दैन्यांत, हीनतेंत व पतितावस्थेंत समाधान मानणें म्हणजे अध:-पाताचा कडेलोट आहे. मिल् म्हणतो त्याप्रमाणे ' संतुष्ट डुकरापेक्षा असंतुष्ट मानव बरा ' पण हें ज्यांच्या ठिकाणीं माणुसकीची जाणीव, किंबहुना आठवण देखील शिल्लक उरली असेल त्यांना.

एक दंतकथा आहे. एका गृहस्थाला स्वप्न पडलें की आपण पुढल्या जन्मीं डुक्कर होऊन आपल्याच घराशेजारच्या गटारांत लोळत राहूं. त्याने आपल्या मुलांना बोलावून सांगितलें की मी मेल्यानंतर कांही महिन्यांनी अमुक रंगाचें डुकर होऊन या गटारांत तुम्हाला दिसेन; त्या डुकराला मारून टाका म्हणजे माझी त्या घाणींतून सुटका होईल. पुढे, ठरलेल्या संकेताप्रमाणे जेव्हा त्या डुकराला मारून त्याची मुक्तता करायला तीं मुलें आलीं तेव्हा तें डुक्कर गयावया करून म्हणालें—" नको रे मला मारूं ! मला या घाणींतच कैवल्य मिळाल्याचें सुख वाटतें !" दैन्यांत, विपन्नतेंत व पतितावस्थेंत समाधान मानण्याचें तत्त्वज्ञान हें इतकें भयानक आहे.

गरीब—श्रीमंत हा भेद नाहीसा झाल्याखेरीज आता मनुष्याचा सांस्कृतिक विकास होणें अशक्य आहे असेंच सर्व विचारवंतांचें निश्चित मत बनलें आहे. विज्ञान, कला, व नीति यांचा विकास या विषमतेमुळे खुंटला आहे हें त्यांनी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ओळखलें आहे. म्हणून धर्मनिर्णय मंडळाच्या अध्यक्षपदावरून विद्वद्रत्न माऊजी दप्तरींसारखे धर्माचे प्रवक्तेहि धन ही संस्था नाहीशी केली पाहिजे असें प्रतिपादन करूं लागले आहेत. ' अर्थमनर्थम् भावय नित्यम् ' या तत्त्वाचाच त्यांनी अधिक स्पष्ट व सुबोध भाषेंत अनुवाद केला आहे. मानवी किंवा नैतिक मूल्यांच्या स्थापनेकरिता आधी या विषमतेचा नायनाट करणें आवश्यक आहे याची साक्ष गांधींनाहि पटल्यामुळेच त्यांनी आपल्या एकादशव्रतांत अपरिग्रह व उत्पादक शरीरश्रम यांचा प्रामुख्यानें समावेश केला. कारण जो धनाच्या नादीं लागला तो माणुसकीला मुकतो. ' पुत्रादपि धनभाजां भीतिः ' त्याचें जीवनविज्ञान कड्या-कुलुपांचें असतें. त्याच्यांत व इतर माणसांत रुपेरी भिंताडें उभीं असतात. धनभाज हा मानवनिष्ठ बनूंच शकत नाही. ज्या समाजांत अशी विषमता असते त्या समाजांतील विज्ञान व कला यावरहि सोनेरी पडदा असतो. विज्ञानाचा व कलेचा उपयोगहि धनाच्या द्वारें अधिक धन मिळविण्याकरता होतो—' हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितम् मुखम्. '

पण धन ही संस्था नष्ट झाली पाहिजे, याचा अर्थ सर्वांनी दरिद्री झालें पाहिजे असा नाही. दारिद्र्य म्हणजे अपरिग्रह नव्हे, विवशता म्हणजे संयम नव्हे. असमर्थतेंत, असहायतेंत समाधान मानल्यानें माणुसकीचा ऱ्हासच होतो. म्हणून ज्या समाजव्यवस्थेमुळे धनावर व्यक्तिस्वामित्व प्रस्थापित होतें व टिकतें त्या व्यवस्थेचा नायनाट करण्याची उमेद व शक्ति विपन्न व वंचित वर्गाच्या ठिकाणीं उत्पन्न करणें साहित्याचें व कलेचें उद्दिष्ट असलें पाहिजे.

पूर्व बंगालांत प्रवास करीत असतांना पोफळ—ताड—माडांच्या गर्द राईत सर्व बाजूंनी पुकुरांनी—लहान लहानशा तलावांनी—परिवेष्टित गवती खोपटांचीं चिमुकलीं गांवें पाहून आम्हाला मोठी मौज वाटे. पण त्या डबक्यांचें पाणी किती गढूळ असेल, तेथे डासांचा किती भयंकर उपद्रव असेल, त्या खोपटांत पावसाचा व ओलीचा किती त्रास असेल इकडे आमचें लक्षहि जात नसे. उलट आमची सौंदर्यदृष्टि संतुष्ट व्हावी म्हणून तें दृश्य तसेंच राहावें असेंहि आम्हास वाटावें ! आता हिला कलादृष्टि म्हणावें की करालदृष्टि म्हणावें ? यांत हृदयांतील सौंदर्यभावना आहे की सौंदर्यासुराची दयाहीन आराधना आहे ? ही कला आहे की माणुसकीला तुडविणारी कालिका आहे !

हाच विरोध गांधींच्या सहृदय वृत्तीला खपला नाही. गुरुदेवांना त्यांनी अगदी कळवळून सांगितलें की लक्षावधी भुकेलेल्यांच्या आक्रोशांत मला पाखरांचें संगीत ऐकूं येत नाही हो ! बेकारांना दोन घास देणाऱ्या चरख्यांत मला अधिक संगीत ऐकूं येतें. बायाबापड्यांचे श्रम हलके करणाऱ्या जात्यावरील ओव्या मला अप्सरांच्या संगीतापेक्षाहि मधुर वाटतात. जी कला प्रत्यक्ष जीवनांतून उत्पन्न होत नाही आणि जीवनाची शोभा व सुबकता वाढविण्याची जिच्या ठिकाणीं शक्ति नाही, ती कला एक कृत्रिम व काल्पनिक मायारूपी जग निर्माण करून माणसाला क्षणभर भुरळ पाडते.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मानवतेच्या या ठिणग्यांचा स्फोट न होऊं देतां त्यांच्यांतून ज्योत कशी निर्माण करतां येईल हाच क्रांतीचा 'यक्षप्रश्न' आहे. साम्यवाद्यांचें म्हणणें स्फोट अपरिहार्यच आहे. अहिंसात्मक क्रांतिवाद्यांचें म्हणणें स्फोट अपरिहार्यहि नाही आणि इष्टहि नाही. अर्थात् ती ठिणगी कोंडून व दडपून टाकण्याचा व विझवि-ण्याचा सतत प्रयत्न करणारें दडपण मात्र दूर सारलें पाहिजे.

आर्थिक विषमतेतूनच हे प्रश्न, त्यांतील विसंगति व अनर्थपरंपरा निर्माण झाली आहे यांत शंका नाही. संपन्न व विपन्न असे दोन वर्ग जोंपर्यंत आहेत तोंपर्यंत परस्परविरोधी स्वार्थसंबंधांचा संघर्ष टाळतां येणें शक्य नाही. वर्गसंस्थाच नाहीशी केल्यावांचून हितविरोध नाहीसे होणार नाहीत हें उघड आहे. विषम परिस्थितीमुळे दोन्ही वर्गांतील माणसांच्या प्रवृत्तींत, भावनांत व संस्कारांत आमूलाग्र भेद असल्याचें दिसून येतें. परिस्थितीप्रमाणे माणसाच्या भावना बनतात, भाषा बनते, जगाकडे पाहाण्याची दृष्टि बनते. म्हणून वर्गभेदजन्य आर्थिक विषमतेचा अन्त केल्याशिवाय अर्थभेदजन्य सांस्कृतिक विषमतेचा अन्त होणें अशक्य आहे. जोपर्यंत नैसर्गिक संपत्तीवर व संपत्ति-निर्मितीच्या साधनांवर एका किंवा अनेक व्यक्तींची मालकी राहील तोपर्यंत या जगाला कौटुंबिक संसाराचें स्वरूप प्राप्त होणार नाही. तोपर्यन्त संसार हा मालक व मजूर यांच्या परस्परविरोधी स्वार्थांचें रणांगणच राहणार. या रणांगणाच्या प्रचंड आगीच्या डोंबांत सर्व मानवी मूल्यांची राखरांगोळी होऊं नये म्हणून प्रतिकारसाधनांच्या शुद्धतेचा आग्रह राखणें आवश्यक आहे. आणि प्रतिकार अपरिहार्य आहे.

माणसाचें पोट नीट नसलें म्हणजे त्याचा मेंदूहि नीट राहात नाही, हा दररोजचा अनुभव आहे. पोटांत कळ उठली म्हणजे मस्तकहि ठणकूं लागतें. पोट व डोकें, पोट व हृदय यांचा संबंध अतिशय जिव्हाळ्याचा आहे—जवळजवळ अभेद्य. म्हणून संपन्नाच्या पोटाला चिमटा घेतल्यावांचून त्याच्या अंत:करणाला पीळ पडणार नाही आणि डोकें ताळ्यावर येणार नाही असें निदान मजुरांच्या पुढाऱ्यांनी ठरविलें. 'मालका'च्या पोटाला चिमटा घेण्याचेंहि..एक तंत्र आणि शास्त्र बनलें. संप हें त्या तंत्रांतलें एक परिणामकारक हत्यार आहे.

आहारशुद्धि व 'सत्त्वशुद्धि' यांचा अन्योन्य संबंध आहे. "अन्नमयं हि सोम्य मनः" मजूर हा आधी प्राणी आहे, अशनपिपासायुक्त जीव आहे, आणि नंतर तो सर्व कांही आहे. मुबलक व चविष्ट आहार उपलब्ध असला म्हणजे भूक हें ईश्वरी वरदान ठरतें. पण माणूस अन्नाला मोताद झाला म्हणजे तीच भूक अभिशाप ठरते. जी भूक आरोग्याचें व तृप्तीचें सुख देतें तीच सर्व पापांचें मूळ होतें. म्हणून मालकांच्या मालकीचा नायनाट करणें हा संपांना आळा घालण्याचा शास्त्रीय उपाय आहे.

मांडवलशाही व्यवस्थेचें आधारभूत तत्त्व हें की सारें जग म्हणजे एक मोठी बाजारपेठ आहे. त्या बाजारपेठेंत माणुसकीचाहि मीनाबाजार भरतो. माणसाचे श्रम,

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शरीरबल, बुद्धिबल, विद्या, फार काय शील देखील विक्रीकरता मांडलेलें असतें. पुण्य, नीति, शास्त्र, कला, सारें कांही विकत मिळेल. माणसांच्या परस्पर व्यवहाराचें पायाभूत तत्त्व सौदा व सट्टा हें असतें. प्रेम, लग्न, शिक्षण इ. सार्‍या व्यवहारांना सौद्याचें तत्त्वज्ञान लागू असतें. जेथे 'वेळ म्हणजे पैसा' आहे तिथे जीवनाचें मोल देखील मोहरांत मापण्यांत येतें. एका निराळ्या अर्थानें सार्‍या मानवी जीवनाची ' सुवर्णतुला ' करण्यांत येते. ज्या बाजारांत माणूसहि विक्रीकरता मांडलेला जिन्नस बनतो त्यांतून माणुसकीच्या उद्धाराचा आणि जोपासनेचा एकच मार्ग आहे. संसाराला विश्वकुटुंबाचें स्वरूप प्राप्त व्हावें हाच एक तरणोपाय आहे. पंडिताची परिभाषा बोलणारा साम्यवादी म्हणेल, अवघा संसार म्हणजे 'कम्यून' बनला पाहिजे. आम्ही प्राकृत जन म्हणूं—अवघा संसार हें एक कुटुंब बनलें पाहिजे.

लाकुडतोड्याचे कपाळावरील घर्मबिन्दूहि खि. रे. टिळकांना ' सुमनांच्या मेळ्या'सारखे सुंदर दिसत. परिश्रमांत पावित्र्य आहे, उत्पादक परिश्रमांत कल्याण-कारित्व आहे, श्रमजन्य वस्तूंच्या योगानेच जगांत सुबत्ता व सुभगता निर्माण होते म्हणून श्रम हीच संपत्ति आहे हें खरें. पण एकाला नाइलाजास्तव श्रम विकावा लागला आणि दुसर्‍याला आपल्या मर्जीप्रमाणे त्याचा बाजारभाव ठरवितां आला तर तोच श्रम माणसाला दीन, हीन व अप्रतिष्ठित बनवितो. वस्तु निर्माण करणारा व विश्व निर्माण करणारा यांच्यामध्ये असलेलें साम्य मनुष्याच्या लक्षांत फार प्राचीन काळींच आलें. मडकें तयार करणारा कुलाल आणि ब्रह्माण्ड घडविणारा ब्रह्मदेव हे एकाच जातीचे मानण्यांत आले. पण विश्वविधात्याचा जो अधिकार तोच वस्तुविधात्यालाहि ज्या दिवशीं प्राप्त होईल त्याच दिवशीं परिश्रमांत प्रसादशक्ति उत्पन्न होईल. उत्पादक परिश्रमांत जर जगांत वैभव व मांगल्य निर्माण करण्याचा गुण असेल तर तो श्रम करण्यांत प्रतिष्ठितांनी व शिष्टांनीहि भूषण मानलें पाहिजे. 'शरीरश्रम' हें व्रत झालें पाहिजे. पण त्याला अपरिग्रहाची जोड पण मिळाली पाहिजे. एकाने राबावें, दुसर्‍याने भोगावें, एकाने दळावें, दुसर्‍याने खावें, अशी स्थिति जोपर्यंत राहील तोपर्यन्त श्रमांत सौंदर्यहि नाही आणि आनंद तर नाहीच नाही. ज्या श्रमापासून अंगकांति, तुष्टि किंवा पुष्टि यांपैकी कशाचाच लाभ होत नाही, ज्याची गणना व्यायामांतहि होत नाही व खेळांतहि होत नाही त्या श्रमाची पोकळ काव्यमय स्तुति कितीहि केली तरी तिच्यापासून आत्मप्रत्यय कसा उत्पन्न होणार ?

कला ही निसर्गाच्या उपयुक्ततेंत व सौंदर्यांत भर घालते. ज्यांत कला असेल त्याला आपण मानवकृत, संस्कृत म्हणतों. केवळ उपकरणांनी जीवनांत संगीत निर्माण होत नाही. सारंगीच्या तारा जुळवितां येण्याकरितांहि संगीताची केवळ भावना असावी लागते. 'रसिकता' ती हीच. निदान स्वतःच्या उपभोगां-करता, आपल्यापुरत्या नवीन भवनाची व भुवनाची उभारणी करण्याचीहि ज्याला पर्वा नाही तो हैवानच. त्याच्या निर्मितींत विपुलता व शीघ्रता असेल, पण कला

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही. आज तो निव्वळ नफेबाज आणि सांठेबाज असल्यामुळेच एकीकडे संस्कृतीच्या रक्षणाचा आव आणून दुसरीकडे 'जवान मर्द मोदका'च्या किळस-वाण्या जाहिराती प्रसिद्ध करण्यांत त्याला खंत वाटत नाही. आज नफ्याच्या हपापाने पिसाळलेला मालक हैवान बनतो, आणि भाकरीचा ध्यास लागलेला मजूर नैवेद्य व प्रसादहि चोरून खातो. त्याला सभ्यतेची व नागरिकतेची जाणीवच राहत नाही. त्याला गुरांप्रमाणे प्राथमिक गरजा भागविण्याचीच विवंचना असते. नफेबाज हैवान जेव्हा मानव बनेल तेव्हाच इतर सारीं माणसेंहि गुरांच्या स्थितींतून वर येतील.

दारिद्र्याच्या व दैन्याच्या स्पर्शाने माणसाच्या प्राणशक्तीचा प्रसन्न झराच गोठून जातो. व्यायामाने शरीराला कांति व पुष्टि लाभते, चर्येवर टवटवी येते. पण नाइलाजाच्या कष्टाने मन विटतें, शरीरहि खंगतें. नाइलाजाच्या कष्टांत वृत्ति रंगत नाही, जीव उबगतो; कामचोरपणा, कुचराई करण्याची वृत्ति बळावते. मन कंटाळलें आणि त्रासलें म्हणजे स्वभावांत तुसडेपणा, चिडखोरपणा येतो; साऱ्या जगाचा राग येतो. परिस्थितींत पालट घडवून आणण्याचें सामर्थ्य नसलें म्हणजे माणूस अवजारांवरच राग काढूं लागतो. कित्येक साधक आपल्या इंद्रियांवर रागावून हातच कापून घेत, डोळेच फोडून टाकत. थोडीशी प्रतिकारशक्ति असेल तर उपकरणांचीच हत्यारें बनतात. वर्दळीला किंवा जिकीरीला आलेली आई लाटण्याचा किंवा झाऱ्याचा उपयोग शस्त्रासारखा करील. हातोडा—कोयता हें श्रमसत्तेचें प्रतीक मानणाऱ्या एका चिडलेल्या बहाद्दराने तोच हातोडा ट्रॉट्स्कीच्या डोक्यांत हाणला. वस्तूंचा किंवा उपकरणांचा विध्वंस विकारवश होऊन मनुष्य करीत असतो. पण कुठलाहि क्रांतिवादी याचें समर्थन करीत नाही. परदेशी कापडाची होळी आपण हिंदुस्थानांत केली, पण तिच्यांत विकार नव्हता. तिच्यांत एक तत्त्व होतें. माणसावरील राग जर माणसाऐवजी वस्तूंवर काढला—दुबळेपणाने नव्हे तर विचारपूर्वक व विवेकबुद्धीने—तर माणसामाणसांतील वैरभाव कमी होईल या हेतूने ती होळी करण्यांत आली होती. वस्तूंचा नाश त्या वस्तूविषयी अरुचि उत्पन्न करण्यासाठी होतो, पण खरा अपराध माणसाचाच असतो. म्हणून दुसऱ्या एका दृष्टीने माणसावरील राग उपकरणांवर काढणें अशास्त्रीयहि ठरतें.

वृत्ति परिवर्तनाकरितां वस्तु परिवर्तनाची आवश्यकता आहे हें निर्विवाद आहे. वस्तुस्थिति बदलली की वर्तन बदललेंच, आणि वर्तनांतूनच वृत्ति बनते. या सिद्धांताला 'वस्त्वनुवर्तनवाद' किंवा 'बिहेविअरिझम्' म्हणतात. हें वस्तु परि-वर्तन घडवून आणण्याकरितां विद्यमान वस्तुस्थितीचा प्रतिकार करावा लागतो. साधनहीन, संपत्तिहीन, विद्याहीन वर्गांतील असंस्कृतपणा, निगरगट्टपणा किंवा बथडपणा औपाधिक असतो; तो त्याचा स्वभावगुण नव्हे. त्याचप्रमाणे श्रीमंताची हृदयहीनताहि औपाधिक आहे. तो उपाधि म्हणजे वर्ग. वर्गनिष्ठ नीतिमत्ता वर्गभेदाचाच परिणाम आहे. म्हणून वर्गभेद निराकरणावांचून गत्यंतर नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वर्गभेद निराकरणाचीं प्रक्रिया व साधनें कोणतीं असावींत या बाबतींत मतभेद असणें निराळें. रोगाच्या चिकित्सेच्या जशा दोन पद्धति आहेत, तशाच अन्यायाच्या चिकित्सेच्याहि आहेत. सडलेला अवयव नाइलाजास्तव तोडावाच लागतो हा एक प्रकार. सडलेला अवयव तोडण्याची पाळी न येऊं देतां तो दुरुस्त करतां येण्या-सारख्या उपचारांचा प्रयोग करावा ही दुसरी पद्धति. एक म्हणतो, दुष्टाचा संहार केल्यावांचून दुष्टावा नाहीसा होणार नाही. दुसरा म्हणतो, दुष्टावा नाहीसा कर-ण्याची युक्ति शोधा, म्हणजे 'दुष्ट' उरणारच नाही.

धार्मिक, तत्त्वज्ञ, परोक्षवादी म्हणाला, संसाराचाच त्याग करून अरण्य-सेवन कर म्हणजे सारे प्रश्न सुटतील; कांही प्रश्न सोडविण्याकरतां सोडूनच द्यावे लागतात. शुद्ध कलावादी म्हणतो, आपली निराळी मनोमय गंधर्वनगरी निर्माण करा म्हणजे सुख लाभेल. नीतिवादी सन्त म्हणाला, अपराधांची क्षमा कर. अपकार सहन कर, वाईटाचा प्रतिकार करूं नकोस. हे सारे सिद्धांत अपुरे, अशा-स्त्रीय व निष्फळ आहेत. गरिबांची गरीबी ही मानवनिर्मित असल्यामुळे ती नाहीशी करतां येते; गरीबांनी संपन्नांची मर्जी संपादन करून त्यांच्या मेहेरबानीवर जगण्याचें कारण नाही; किंबहुना एकाच्या कृपेवर किंवा भरवशावर दुसरा जगूं लागला तर दोघांचाहि अध:पात होतो; म्हणून 'भीक', 'चोरी', आणि 'दान' या तिन्ही संस्था नाहीशा झाल्या पाहिजेत, असा आशादायी व क्रांतिकारक संदेश युगप्रवर्तक, क्रांतिदर्शी, नवीन अर्थशास्त्राचा द्रष्टा, मानवतेचा पैगंबर कार्ल मार्क्स याने दिला. मार्क्सच्या पूर्वीचें 'अर्थशास्त्र' हें 'स्वार्थशास्त्र' होतें. जुन्या 'स्वार्थ-शास्त्रा'ऐवजीं नवीन 'अर्थशास्त्रा'चें निरुपण व प्रतिपादन मार्क्सने केलें. म्हणून क्रांतीच्या क्षेत्रांत महर्षि कार्ल मार्क्स हा मानव्याचा पहिला पैगंबर आहे.

फक्त त्वेष, प्रकोप आणि वर्गभावना जागृत करणें म्हणजे समाजवाद किंवा साम्यवाद नव्हे. वर्गभेद निराकरणाची विशिष्ट पद्धति व प्रक्रिया निश्चित करणें, हें शास्त्रीय क्रांतितंत्राचें वैशिष्ट्य आहे. आज विज्ञान व नीति, शास्त्र व कला, बुद्धिनिष्ठा व भावनात्मकता यांच्यांत भेद व क्वचित् विरोध दिसून येतो. या भेद-विरोधांचा परिहार करून त्यांचा अविरोध साधणें क्रांतिप्रवर्तकाचें एक महत्त्वाचें कार्य आहे. आर्थिक विषमता ही अपरिहार्य व अनिराकरणीय आहे या समजुती-मुळे पूर्वी अर्थवंचित लोकांना अर्थसंपन्नांच्या उदात्त भावनेवर विसंबून जगावें लागे. आर्थिक विषमतेच्या शास्त्राचें कठोर दृष्टीने विश्लेषण करून वर्गभेद निराकरणाच्या प्रक्रियेचें प्रतिपादन मार्क्सने केलें.

मार्क्सने दलित व वंचित मानवाला आशेचा, आत्मविश्वासाचा संदेश देऊन जीवदान दिलें. गांधींनी एक पाऊल पुढे टाकून मानवसत्तेच्या संस्थापनेचें मानवोचित साधन व तंत्र सांगितलें. म्हणून त्यांना मानवतेचे आधुनिकतम आणि म्हणून अद्यतन पैगंबर म्हणावें लागेल. वस्तुपराङ्मुख न होतां वस्तु-परिवर्तनाचा संकल्प करणें, कल्पनेच्या गंधर्वनगरींत गुंग न होतां या जगाचेंच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नंदनवन बनविण्याचा उद्योग करणें; अन्याय, अत्याचार व अपकार सहन करण्या-ऐवजीं अन्यायी, अत्याचारी व अपकारी यांची सेवा करण्याकरितां अन्याय, अत्याचार व अपकार यांचा आमरण प्रतिकार करणें, या अपूर्व तंत्राचा शोध व प्रयोग ज्या सत्याग्रहाच्या प्रणेत्याने व प्रवर्तकाने केला त्याने मानवाला मानव-तेचा संदेश दिला. धनिकशाही युगांतील 'दुकाना'चें मकान बनवितांना मकानांत राहणारा 'माणूस' शिल्लक ठेवण्याची काळजी घेतली पाहिजे; दुष्टतेचें निराकरण दुष्टांच्या उद्धाराकरितां आहे; गरिबीचें निराकरण गरिबांच्या उद्धाराकरितां आहे; आजाराचें निराकरण आजाऱ्याला जगविण्यासाठी आहे; गुन्ह्याचा प्रतिकार गुन्हे-गाराला वाचविण्याकरितां आहे; अन्यायाचें, पापाचें निराकरण इष्ट आहे; अन्यायी माणसाचा, पाप्याचा अंत करण्याचा हेतु असणें अनिष्ट आहे. संपन्न आणि विपन्न या दोन्ही वर्गांतील व्यक्तींमध्ये मूलभूत माणुसकीचें तत्त्व सामान्य आहे. नित्य घाणींत राहणाऱ्या व घाणींतच वावरणाऱ्या भंगिणीचें गोंडस मूल खराट्याशेजारीं सुखाने झोंपूंहि शकतें, यांत जशी माणसाची प्राणिसुलभ अदम्य जिजीविषा शेवटीं बलवान् ठरते, त्याचप्रमाणे वर्गभेद निराकरणाच्या प्रक्रियेंतहि त्याची सहृदयता व बंधुभाव दुरतिक्रम आणि प्रबळ ठरला पाहिजे. प्रतिकाराचें तंत्र देखील बंधुत्वाच्या उत्कर्षाला पोषक असलें पाहिजे. या प्रयत्नांतूनच गांधींच्या अहिंसक प्रतिकाराच्या प्रक्रियेचा जन्म झाला.

पण प्रतिकाराचें तंत्र अहिंसात्मक असो की अहिंसानिरपेक्ष असो, वर्गभेद निराकरण हेंच त्याचें साध्य असलें पाहिजे. मालकमजूर हा भेद जोंपर्यंत कायम राहील तोंपर्यंत संप अपरिहार्य आहेत. त्यांची मर्यादा मात्र राखली पाहिजे. केवळ अडवणुकीकरतां किंवा वैतागामुळे संप पुकारणें उभयपक्षीं अहितकारक होईल. संप हें हत्यार आहे. हत्यार कांही खेळणें नव्हे. पोराच्या हातीं कुऱ्हाड दिली तर तें दिसेल त्या झाडावर चालवून पाहत. कुऱ्हाडीच्या अशा अविवेकी 'प्रयोगा'नेच सर्वत्र खेळखंडोबा होईल. संपाच्या हत्याराचाहि अविवेकी व अमर्यादित प्रयोग झाल्यास अनवस्था माजेल. वर्गभेद निराकरणाच्या कामीं श्रीमंतांनीहि गरिबांशी सहकार्य करावें यांतच उभयतांचें कल्याण आहे. श्रीमंतांनी सहकार्य करणें म्हणजे स्वतःच्या श्रीमंतीच्या विनाशाला हातभार लावणें. असें झालें तर वर्गनिराकरण गोडीगुलाबीने व सामोपचाराने होईल. एरव्ही लढा अपरिहार्य आहे. त्यांत विषाद किंवा खंत वाटूं देण्याचें कारण नाही. हिंसेच्या प्रयोगावांचून, माणसांच्या जिवाला इजा न करतां लढा करण्याची हातोटी किंवा युक्ति हें क्रांतियुगांतील 'कौशल्य' आहे. त्यांत असहकारिता, संप, सत्याग्रह इ. साधनांचा समावेश होतो. वर्ग-समन्वय अशक्य आहे, अशास्त्रीय आहे. वर्गनिराकरण आवश्यक आहे. तें समोपचाराने झालें तर उत्तमच. एरव्ही अहिंसेच्या व सभ्यतेच्या मर्यादा संभाळून निकराचा लढा करणें आवश्यक नव्हे तर इष्टहि आहे.

भांडवलदारी समाजव्यवस्था हेंच एक प्रचंड असत्य आहे, एक जगद्व्याळ स्तेय आहे, केन्द्रीभूत हिंसा आहे. तिचा प्रतिकार सत्याने, अस्तेयाने व अहिंसेने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करतां येतो हें तर्कानें व प्रयोगानें पटवून देण्याचें सामर्थ्य ज्यांना असेल, भविष्यकाल त्यांचा आहे. केवळ निषेधानें किंवा उपेक्षेनें यापुढें भागणार नाही. विधायक प्रतिभेची व पराक्रमाची आवश्यकता आहे. कोंबडा झाकून ठेवल्यानें दिवस उगविण्याचें टळणार नाहीं. समाजांत जोपर्यन्त एकीकडे संग्रहाची प्रतिष्ठा आहे, तोंपर्यन्त दान, भीक व चोरी या संस्था राहाणारच. ज्या समाजांत दान, भीक व चोरी या संस्था राहाणारच नाहीत, त्याच्या व्यवहारांत असत्य व हिंसा यांना फारसा अवकाश राहणारच नाही. अर्थव्यवस्था बदलल्यानंतर लोकांच्या नैतिक व सांस्कृतिक जीवनांत आपोआपच परिवर्तन होईल. अर्थक्रांतीची प्रभावशाली अहिंसक प्रक्रिया व तिच्या पद्धतशीर प्रयोगाची कला विकसित करणें हा एकच तोडगा यावर आहे. प्रतिकाराचाहि समावेश सेवेंत झाल्याखेरीज केवळ विधायक सेवाधर्मानें क्रांति होण्याची आशा नाही. सेवाधर्मानें घडवून आणलेल्या क्रांतीनें जी समाजव्यवस्था प्रस्थापित होईल तिच्यांत उत्पादनहि सेवेकरितांच झालें पाहिजे. 'भोगाकरितां उत्पादन' हें स्वार्थशास्त्राचें सूत्र आहे. 'सेवेकरितां उत्पादन' हें सर्वार्थशास्त्राचें तत्त्व आहे. सेवेकरितां उत्पादन म्हणजे एकमेकां-करितां उत्पादन, म्हणजेच सर्वांकरितां उत्पादन. तसें झालें म्हणजे वर्गभेद संपलाच.

जो मृत्यूला भ्याला तो नित्य- नवजीवनाच्या प्रसादाला मुकला. ज्याला अमरत्वाचे डोहाळे लागले असतील त्यानें 'आपुल्या मरणा'च्या अनुपम सोहळा पाहाण्याची तयारी ठेवलीच पाहिजे. म्हणजे तो मरणोन्मुख असला पाहिजे असें मात्र नाहीं. अमरत्वाच्या सिद्धीसाठी मृत्यूला जिंकण्याची एकच युक्ति आहे, आणि ती म्हणजे नवीन जीवनाच्या विकासाकरितां आत्मविसर्जनाला तयार राहणें. प्रत्येक मातेला याचा प्रत्यय व अनुभव असतो. प्रसूतिवेदना सहन करायला जी तयार नसेल तिला मातृत्वाच्या रूपानें नवजन्माचा आनंद लाभणार नाही. प्रसूतिवेदनांतूनच 'संतति'—जीवनाचें सातत्य निष्पन्न होतें. प्रसूतींत अनेकदा स्वतःचे प्राण देऊनहि नवीन प्राण्याला जन्म द्यावा लागतो. ग्रीक दंतकथेंतील फिनिक्स पक्षाविषयीं अशी जनश्रुति आहे की त्यानें स्वतःच्या चिताभस्मांतून पुनर्जन्म घेतला. जेथें स्वतःच्या चितेंतून पुनर्जीवित होण्याची शक्ति आहे तेथें मृत्यूच नाही. अखंड जिजीविषा—अमरत्वाची अदम्य आकांक्षा—हा जीवाचा व समाजाचा स्वभाव आहे. स्मशानवासी प्रलयंकर रुद्रच शुभंकर शिवशंकरहि आहे. याप्रमाणे मृत्यू जीवनाचें अस्तर आहे. नवीन जीवाला जन्म देतांना मातेचा प्राण न गेला तरी तिचा पुनर्जन्म होतोच. समाजांतील स्थित्यंतराच्या बाबतींतहि कांहींसें असेंच होतें.

मार्क्सवाद्यांचें एक स्वतंत्र समाजविज्ञान आहे. पण त्यांतहि मृत्युनिष्ठा नाही; मृत्यूच्या द्वारें जीवनसिद्धि व जीवनाचें सातत्य आहे. वस्त्वनुवर्तनवादांत—बिहेवियरिझम्‌मध्यें—ज्याप्रमाणें पुष्कळच तथ्यांश आहे, त्याचप्रमाणें या 'मृत्युद्वारें जीवना'च्या सिद्धान्तांतहि बरेंच तथ्य आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ज्या माणसाची दृष्टि अद्यतन ज्ञानाच्या मर्यादा ओलांडून पलीकडे पाहायला सरसावते त्याच्या पंचप्राणांना बेसुमार ताण हा पडणारच. एक डोळा स्वतःच्या प्राणावर ठेवून दुसऱ्या डोळ्याने मर्यादित सृष्टीपलिकडे पाहाण्याचा घाट घालणाराचें क्षितिज फारसें विशाल राहूच शकत नाही. ज्याची तयारी प्राण पणाला लावण्यापर्यन्त जाऊं शकेल त्याच्याच प्रतिभेला नव्या जगाचा साक्षात्कार होऊं शकेल, त्याचेंच ज्ञान प्रचलित मर्यादांच्या पलीकडे जाईल. ज्याला नवें जग 'परवडत' नसेल त्याने त्याची आकांक्षाहि धरूं नये. नव्या जगावर थिल्लर प्रेम करणाऱ्या माणसालाहि निसर्ग नियमाप्रमाणे नव्या जगाच्या वाढत्या संसाराचा 'नको तो' परिणाम पाहाण्याचा प्रसंग टाळतां येत नाही. "गरिबीमुळे पोट पाठीला जरी चिकटलें तरी त्या अडचणींतसुद्धां त्या लहानशा 'परिणामा'ला आपला वाढता संसार थाटण्यापुरती जागा सहज सांपडते." राम व कृष्ण या युगप्रवर्तकांच्या भावी कार्याचे डोहाळे कौसल्या व देवकी यांस होऊं लागल्याचें वर्णन आपल्या पुराणांत आहे.

अविच्छिन्न प्रजातंतूच्या रूपाने किंवा कर्माच्या रूपाने वैयक्तिक व सामाजिक जीवनाचा प्रवाह अनंत व अखंड राहतो, अशा अमरत्वाच्या अनेक उपपत्ती प्राचीन व अर्वाचीन मीमांसकांनी मांडलेल्या आढळतात. या सर्व उपपत्तींची सत्यता भौतिकशास्त्रांचा विकासच ठरवील. पण ज्याला नचिकेताप्रमाणे अमरत्वाचा ध्यास लागला असेल त्याला यमराजाच्या आतिथ्याचा स्वीकार करण्याची हिंमत राखावी लागेल हें प्रमेय निर्विवाद आहे.

अभंगाचें वेड

संध्या आणि उषा, आवडल्या तेव्हा
अनंत नीलिमा आतां रुचे. १
निर्झर निनाद, आवडला तेव्हा
सागर संगीत, आतां रुचे. २
पर्वती पाहून, भिसावलों तेव्हा
आता हिमनग, ओढी मन. ३
लावणीचें तेव्हा, लावण्य रुचलें
आतां अभंगाचें, वेड जीवा. ४

—नारायण माधव सरपटवार

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गद्यगीत

कांती बुधे

★

[विदर्भातील एक उदयोन्मुख कवि श्री. कांती बुधे यांची गद्य-गाणीं "सत्यकथा", "सुषमा", "युगवर्णा" इ. मासिकांत यापूर्वी येऊन गेलेलीं आहेत. त्यांचा गद्यगीतांचा संग्रह "हिमीशिखरें" या शीर्षकानें पुढील महिन्यांत प्रकाशित होत आहे. श्री. पु. भा. भावे, श्री. शं. बा. शास्त्री सारख्या रसिकांनीं हीं गद्यगाणीं वाचून अत्यंत अनुकूल अभिप्राय दिले आहेत. अशा या तरुण कवीची काव्यसंपदा मराठी साहित्याचें दालन उत्तरोत्तर समृद्ध करील अशी आशा आहे. —संपादक]

(१)

चंद्रताऱ्यांनी आकाश उजळून येतं, बाललीलांनी घर निनादून जातं, मंजुळ स्वरलहरींनीं वायूच्या रोमरोमांत चैतन्य खेळूं लागतं.

कलेचा आविष्कार होतो तेव्हां मी सुद्धां कोण बेभान होतें. पण क्षणभरच.

हळूहळू मायेचे पाश वळावतात अन् मग संकेताचे सारे बंध झुगारून मी निसर्गांतील चिमण्या अर्भकांचे कुणाहिजवळ कौतुक करू लागतें.

"तुझाच" ह्या एकमेव शद्वांत तूं अंग चोरून बसलेला दिसतोस. उत्कंटा-युक्त नजरेने माझ्याकडे बघू लागतोस.

पण तुझं कौतुक करण्याइतपत मी कुठं वेडी आहे !

"तुझाच" ह्या शद्वानं वत्सलतेऐवजी रमणीचेंच मधुर स्वप्न डोळ्यांत उभें केलें आहे श्याम !

(२)

काय भुरळ पडली असेल कोण जाणे,

पण जुनं नव्याइतकंच सतेज वाटू लागतं, मन वेधून घेतं.

कसल्याशा अनिवार प्रेरणेनं मी दूरदूर जाऊं लागतें, कोकिळेच्या त्याच त्याच संगीतानं बेभान होतें.

त्या जुनाट पेठेंत शिरून वेड लावणाऱ्या जीर्ण वस्तूच घेऊन घरीं येतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खरंच, किती किती खुळी मी.

पण असल्या भिकार मोहानं मी नागविलें गेलें आहे. शतकानुशतकें माझी सारखी फसगत होत आहे.

जखडलेलं मनच नव्यानव्या रूपानं नटून मला भुलवीत असेल, नाहीं !

*

(३)

रात्रीचे करुण आर्तस्वर माझ्या कानावर आले. निसर्ग शोकाकुल दिसत होता. आभाळ कण्हत होतं,

तुझं अमर गीत गाऊनहि विश्व भारलं गेलं नव्हतं. माझी साधना अपुरीच होती. सिद्धीचा तो दिव्य क्षण अजून दूर होता.

एकाएकी तुझ्या स्पर्शानं वायू थरथरू लागला. तुझ्या दुःसह सान्निध्यानं तो घामाघूम झाला होता.

असाच तूं सृष्टीग निल्याचा भेदरून सोडतोस अन् कुठंतरी लपून असतोस तिच्या मागं, नाही कां !

आणि उद्यां तूं मूर्तिमंत उभा झालास म्हणजे ! तुझ्या तेजाळ सान्निध्यांत काळीशार दिसणारी माझी इवलीशी आकृति बघून माझी मीच लाजलाजून मला नकोशी होईन की !

*

(४)

कामिनीच्या अधरओष्ठांतून जन्मास येणारा, हंसऱ्या गुलाब कळ्यांशी प्रेम-चेष्टा करणारा, उषासंध्यांच्या रक्तचषकांतून मधुपान करणारा तो रक्तिमा !—

पण——ह्या अनारक्त चर्येवर त्याची एकहि छटा दिसू नये ना !

मानव जागा होण्यापूर्वीच उषेनं माझ्या अंतःपुरांत हसत हसत प्रवेश केला खरा. पण मला हुरूप म्हणून कांही वाटेना. सारी रात्र रडून रडून सुजलेले हे नेत्र तिच्या तेजानं फुलले नाहीत कसे !

चंद्ररम्य उद्यानांत कलेचा शाश्वत सुंदर विलास नित्याचा चालू असतो.

पण ह्या माझ्या उद्यानांतील कळ्या मात्र प्रत्यहीं गळून पडतात लहरी निसर्गाच्या दांडगाईनं.

*

(५)

अंधारकोठडींतून कित्येक दिवसांनी बाहेर येणाऱ्या माणसाला प्रकाशांत प्रत्येक वस्तु रम्य दिसू लागते.

तुझ्या सर्वव्यापकतेची ओळख पटल्यावर वस्तुजातांतून विविध रूपांत सौंदर्य वेचून आणतां येईल रे मला.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पण अजून तूं दूरदूर आहेसा वाटतोस; तुझ्यावांचून जीवन शापित आहेसं वाटतं.

तुझ्या सन्निध येण्याचे सारेच मार्ग खुंटले आहेत का रे !

की खडतर जीवनाच्या आशंकेनं मला नुसता आभासच होत असेल हा?

रात्रीच्या अथांग उदरांतून दिवाभीताचं जग निर्माण होतं. त्यांत तो नित्य बेभान होतो—इतका की सूर्यप्रकाशांतील विश्वाची जाणीवसुद्धा नसेत त्याला.

—पण म्हणून तें मिथ्या असेल का !

*

६

केवढा रे भव्य तुझा संसार !

विश्वाची सगळीं सूत्रें चालवूनहि तूं नित्याच्या उल्लसित दिसतोस.

ह्या माझ्या चिमुकल्या संसारांत मात्र मी कोण भरडून निघालें आहे.

पण ही सुद्धा तुझी कृपाच नाही तर काय !

अनेक दुःखांच्या आवर्तांनी वासनांची भुतें पाचोळ्यागत केलीं आहेत.

आकाशांत शुभ्रचांदणं पसरावं त्यागत हळूहळू तुझ्या अमूर्त विश्वाचा अंतरीं आविष्कार होत आहे.

मला खात्री आहे—

चंद्रास हृदयांत कोरून ठेवणाऱ्या पुष्करणीप्रमाणं अहोरात्र चिंतनांतून हें अंतःकरण तुझी मूर्ति आकारास आणील आणि मग साधनशृंगाराचीं विविध वस्त्रें गळून प्रीति स्वतःच एक अखंड साक्षात्कार होऊन राहील.

*

(७)

तुझ्या संगीतानं सारं अंतःपूर निनादून उठतं अन् मग कित्येक दिवस देहभान हरपून जातं.

निष्क्रिय म्हणून जग माझा धिःकार करतं. खरोखरीच रे मी कलाचतुर नाही, व्यावसायिकाइतकी धूर्त नाही.

काय जे असतील ते हे वेडे नेत्र! त्यांच्या पुष्करणींत वस्तु तरळू लागते न लागते तोंच तींतून तूं हसतांना दिसतोस. तुझ्या-माझ्यामध्ये उभा असलेला जगाचा अंतरपाट गळून पडतो.

केवढा रे हा प्रेमाचा प्रभाव !

अनंत नीलिमा मेघामेघांनी शकलित करून टाकणारं मन कुठल्याकुठं विरून जातं अन् अंतरिक्षाचा बांध फुटून अगणित प्रकाशज्योति धारेला लागतात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(८)

फुलांफुलांतून वेचून आणलेला सुगंध उद्यान वायूच्या रोमरोमावर पसरतें.

दिवस निघून जातो तो निशेच्या अस्फुट यौवनावर संध्यारागाचं सौंदर्य उधळून.

मन आपल्या स्वप्नतारकांची क्षणोक्षणी लूट करतं. वास्तवाचं अंतराळ तेजानं तळपून उठंत.

जीवित आपलें संपूर्ण दर्शन घडविणाऱ्या ध्येयसृष्टीचें बलिदान करतें.

आणि तीनत्रिकाळ वितानाचा ढोल बडवीत मृत्यू हर्षानं, उन्मादानं थैमान घालूं लागतो.

*

(९)

पृथ्वी आणि चंद्र—दोन अनुरक्त जीवांना दुरावणारा असूयेचा कसला हा काळा पडदा आज आकाशानं सर्वत्र पसरला होता.

दोघांच्या प्रेमाची साक्ष असलेले हे असंख्य दीप, तेहि पण त्या दुष्टानं मालवून टाकले होते.

कसल्यातरी भीतीनं माझं हृदय कातर झालं होतं.

नित्य हसून माझें स्वागत करणारी कमलपुष्पें आज पुष्करणींतून आपल्या फणा काढून माझ्या अंगावर विषारी फूत्कार टाकीत होतीं.

त्या भयाण काळोखांत माझ्या काळ्याशार गात्रांवर आसक्त होऊन दिवाभीत मला कवटाळू पहात होता.

भीतीनं माझं अंग थरथरत होतं.

रात्रीं पुष्पकोषांत गुरफटलेल्या भृंग्याप्रमाणं मी प्रकाशासाठी धडपडत होतें.

एकाएकी तूं माझ्यासमोर उभा झालास.

तुझ्या पायाखालीं कोट्यवधि सूर्य–पतंगांच्या छिन्नविच्छिन्न पंखांचा सडा पडला होता.

*

(१०)

सकाळीं आंधळा माझ्या दृष्टीस पडला. त्याचा तो भरजरी पोशाख पाहून मला मारीच आश्चर्य वाटलं. दृष्टिहीन असूनहि बहुमोल वस्त्रांचा कोण हा सोस !

क्षणभराने माझी मीच उद्गारलें. “एका आंधळ्यानेच आज मला दृष्टि दिली. मी गाई. मला वाटे—ती माझी जीवनसाधना असेल. पण इतरांसाठीच मी गात होतें आजवर. आतां मात्र गीतपुष्पांना टराविकाच्या पायदळीं तुडवून दैनंदिन जीवनांतील फुलपाखरं अनिर्बंधपणे उडवीत राहीन मी!”

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"काय लिहूं ?"

शकुंतला दिवाणजी

☆

खरंच ! काय लिहूं मी ! कशाने मात्र बरं वाटेल ! कांही केलं तरी कसं तें चैन पडत नाही. घरभर भिरभिर हिंडावं, क्षणभर उभं रहावं, काम करायचं तेंहि क्षणभर आठवून करावं, अशी विचित्र मनःस्थिति झाली आहे. हातांत एखादा अमृतकुंभ असावा, आपल्या ताब्यांत केवढं घबाड आलं आहे म्हणून अभिमान करावा, क्षणभर ताब्यांत यावं आणि त्या तोऱ्यांतच पुढें पाऊल टाकावं. तोंच एखाद्या धारीनं त्या हातावर झडप घालून तो घट खाली पाडावा. पाडला तोहि कसा ! अगदी उपडा. आसवांनी नाही का भरायचा तो ! अमृताच्या कुंभाला आसवांनी भरायचा आणि एका क्षणापूर्वी आनंदानं भरलेलं हृदय यक्षिणिच्या कांडीने दुःखमय करावयाचं. हृदयाचा आणि कर्तव्याचा काय संबंध. जणूं हृदय भावना हरवल्या आणि अगदी निष्टुरतेने त्या हतभागी जीवाला तो घट घेऊन पुढे पाऊल टाकायचं पुढे ! आणखी पुढे ! काय म्हणावं या विधिघटनेला !

कोणावर रागावूं मी ! कोणावर चिडूं ! क्षणभर वाटतं टाकून द्यावं हें हतभागी जीवन ! जीवनाचा विचार करायला लागलं की वाटतं हेंच जिणं जगायचं होतं तर आधी तरी कां चव दाखवली सुखाची त्या 'कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुम्' विधात्यानं ! बाकी त्याला नांवं ठेवणारी मी ! वेड्यांतच गणना करतील सारीं माझी. जीवन सुसह्य आणि सुखकर आहे असं क्षणभर वाटायला लागलं तोंच तें किती निर्घृण भयंकर व असह्य आहे हें दाखवलं त्या दुर्दैवानं. आता कळलं की माझ्या जीवनांत निराशेची पडछाया मधून मधून का दडायची तें ! "गांभीर्याच्या रूपाने तव भूवरिं अवतार हा" ! यांचं हें काव्य त्याचीच साक्ष पटवतं. "शकू तूं अकालीं प्रौढ नको होऊस बुवा. माझ्याकडे बघ मी प्रौढ बनलों तरी 'प्रौढत्वीं निज शैशावास जपणें' याच वृत्तींत माझा काळ घालवीन." त्यांना प्रौढ व्हावं लागलं नाही. बाकी माझी अकालीं प्रौढत्वाची भूमिका मात्र कायम करावी लागली. ते परगांवीं गेले. माझ्याबरोबर सुखदुःख भोगायचा त्यांना कंटाळा का आला ? सुखदुःखाची त्यांनी वांटणी केली त्यांत मात्र त्यांनी स्वार्थ साधला. ते सुख आपल्या बरोबर घेऊन गेले आणि माझ्या वांटेला मात्र दुःख ठेवलं. कां नको रागावूं मी त्यांच्यावर ? "मला तुझ्यावांचून करमत नाही" मला रडवण्यासाठीच का हें सारं होतं !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीवाला कोणाचा तरी आधार हवा असतो. किती गोड नि सुखकर आधार होता तो ! त्या आधारावर किती बेफिकीर होतें मी ! पण भवितव्य किती भेसूर होतं. आधी जर कळलं असतं तर किती घाबरलें असतें मी ! पण भवितव्यतेला माझ्याशी लपंडाव खेळायाचा होता. मी "विसाव्याला" अगदी टेकून निश्चिंतपणे त्यावर मान टाकून सुखकर भवितव्यतेच्या गोड दर्शनाची वाट पाहत होतें. कशी दिसली भवितव्यता ! काय भयंकर तिचं तें रूप ! डोळे झाकून का ती नजरेआड होणार आहे ! कंबर बांधून तिच्याशी खेळायचं आहे मला ! "अंधारास आता भ्यालिस काय?" असं विचारणारं तें कवि-हृदय किती निष्ठूर बनलं ! छे ! त्या हृदयाला तरी कल्पना होती का ? त्या हृदयाला दुसऱ्यांना सुखवायचं हेंच माहीत. त्या हृदयावर अपघात झाल्यास तें बधिर होईल नाही तर काय ! मीच किती निष्ठूर ! ज्या जीवाशिवाय मी क्षणभर राहूं शकत नव्हतें, दोन दिवस परगांवीं गेले तर एकएक तास कठीण वाटायचा. घरांत असल्यावर एक क्षणभर देखील नजरे आड होऊं देत नसे मी. तीच मी मजेंत जेवतें, झोपतें, चांग्राला जातें, शाळेंत जातें. प्रेम काय मनुष्याबरोबर येतं नि त्याच्या बरोबर जातं का ? माझं जर खरं प्रेम त्यांच्यावर असतं तर मी जगूं शकलें असतें कां ? पण मी तरी काय करूं ? मी जीवन जगतें, पण तें कसें ? आशाविरहित जीवन अगदी शुष्क नि रूक्ष. त्यांतील गोडी गेली, माधुर्य गेलं, आनंद गेला. आशा आहे म्हणून मनुष्य जगतो म्हणतात. पण मी कसली आशा करायची ? माझ्या आशेवर केवढा जबरदस्त प्रहार झाला आहे. एक घाव अन् दोन तुकडे. पुढची आशा करायची. स्वत्व विसरून जायचें आणि निवृत्ति नाथांची शिकवण आचरायची ! अजून जीवनांतला स्वार्थच संपला नाही तोंच परमार्थ आचरावयाचा ! स्वतःचं संपलं नाही तोंच दुसऱ्याकरिता शरीर झिजवायचं. हो खरंच, तत्त्वज्ञानांत नाही का माझं जीवन घालवायचं. निष्काम कर्म करायचं, दुसऱ्याला सुखवायचं, हेंच माझं जीवन आहे आतां. माझं खरं जीवन संपलं. एका जीवनावर पडदा पडला. दुसरा अंक सुरू. आठवणींनी सुख होतं म्हणतात. पण आठवणींचा तरी कुठं अजून संग्रह झाला आहे ! सारंच अपुरं. ह्या विधिघटनेला तरी काय म्हणावं ! खूप चिडावसं वाटतं. सगळं सगळं फेकून, मोडून, तोडून द्यावं असं वाटतं. पण हेंहि करून माझ्या हातीं काय येणार ! निष्टूर निराशा. घोर अंधःकार, कटु कर्तव्य आणि भीषण भवितव्य. जगूं कां मी यासाठीच ? पण न जगून सांगूं कोणाला ! माझा प्रकाश हरवला. अंधारांतच चांचपडत पुढे पाऊल टेवावं लागणार हो ! भवितव्यतेशी दोन हात करावे लागणार हें निश्चित !*

*

* स्वर्गीय मुन्शी प्रेमचंद यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नींनी "मै लुट गई" म्हणून असेंच हृदयाला घरें पाडणारें आत्मकथन केलें होतें.—'संपादक, युगवाणी'

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'शून्यांत परार्धें भरलीं'

प्रभाकर माचवे

☆

पूर्णापूर्ण म्हणती आवर्जून वेदान्ती,
बौद्ध त्याच तत्त्वाला शून्य-शून्य गणती.
बद्ध झाला पुरुष नाचतांना एकान्तीं
पोकळ या मायेची भरीव हीच भ्रान्ती!
....'दालदा'चे खावून तळलेले जिन्नस,
  उभ्या आडव्या कोड्यांचें चार टेंभी बक्षीस
  मिळवीन आशा ही उत्साह हा अमूप
  कारकुंड्या! भाग्याची देवता रे कुरूप!
असले रटाळ तूं लिहायाला लागला?
बली-युगीं राक्षस प्रतिभेचा खुजला?
आटली का प्रतिभा? बाटलींत भरली!
('अर्क मोठे'!) गरिबा चिन्धी नसे उरली.
....चिंधी टोपी घालुनी उंदिराने दंडुका
  उगारला हक्कांवर रोखल्यात बंदुका!
  संस्कृतीच्या रक्षणीं दाढी राखा संघशः
  संस्कृतीच्या भक्षणीं लाठी राखा संघशः
टिळकारविंदांच्या आध्यात्मिक स्वराज्यीं
डॉलरांची चटणी, भाषणांचीच भाजी.
मोहनाला पूतना खाते, उरे बबण्या
माचे-सुना-पुतण्या-टायपिस्ट-मेहुण्या!
....खुदीराम-गैनू-हेमू कुठल्या झाडाचा पाला
  वर्तमानपत्रविक्या शिक्षण-सचिव झाला!
  महाजन महाकवि दीड हळकुंडांत!
  चाले लष्करी तयारी अहिंसेच्या खंडात!
साखरेची नको वाण अभीरसुधेची लूट
सिनेमांत रंगलेले चेहरे घ्या सहा-फूट!
चौपाटीच्या वेळेवरी टिळकाचा पुतळा
सूर्य डुबे पाहतसे माथ्यावरी कावळा!

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघापुढील निकडीचें कार्य

पु. य. दे श पां डे

☆

चांदा येथे भरलेल्या विदर्भसाहित्यसंमेलनाच्या बाराव्या अधिवेशनात संमेलनाध्यक्ष डॉ. मा. गो देशमुख यांच्या खास विनंतीवरून विदर्भसाहित्यसंघाचे उपाध्यक्ष श्री. बाबासाहेब देशपांडे यांनी ता. पांच रोजीं संघापुढील निकडीच्या कार्यासंबंधी जें भाषण केलें त्यांतील महत्त्वाचा भाग पुढे दिला आहे:——

राज्यभाषा आणि मातृभाषा यांचा विकास परस्परविश्वासानेच होईल

हिंदी भाषा ही अखिल हिंदुस्थानाची राज्यभाषा झाली पाहिजे, असा आवाज प्रथम महाराष्ट्रीयांनीच उठविला, हें विसरून चालणार नाही; व हिंदुस्थानांत स्वतंत्र लोकसत्ताक राज्य स्थापन झाल्याबरोबर हिंदी ही त्याची राज्यभाषा झाली; याबद्दल आम्हा महाराष्ट्रीयांना समाधानच वाटत आहे. पण, राज्यभाषा या नात्याने देशाच्या राज्यकारभारांत आणि सार्वजनिक व्यवहारांत हिंदीला मिळणारें स्थान मान्य करूनहि, आपल्या मातृभाषेचें संरक्षण आणि संवर्धन करणें, हें आम्ही आमचें पहिले कर्तव्य समजूं. म्हणून, या मराठी प्रांतांतील मराठी भाषा बोलणारा एकहि माणूस अ-मराठी होणार नाही, अशी दक्षता घेणें हें विदर्भ साहित्यसंघाचें सध्याच्या परिस्थितींत मुख्य कार्य आहे. आज नागपूर शहरांत सर्वत्र हिंदीचा इतका बोलबाला चालू आहे की, मुम्बई शहर हें महाराष्ट्राचें आहे

(पान ९३ वरून)

....देवा अशा जगामध्ये जगणें हें महादिव्य!
क्षुधा-होमीं सर्व हव्य, अन्न झालें पंचगव्य!
सोंवळा गोंधळ घिंगा, घाला पिंगा, रंगण
नाच जरी त्रिवडला—म्हणुं वाकडें आंगण!

[युगवाणीच्या व्यक्तिगत संग्रहांत डिसेंबर १९४८ पूर्वीपासून असलेल्या कवितांतून.—संपादक]

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

किंवा नाही याबद्दल जमा वाद उत्पन्न झाला आहे, तसाच वाद उद्या नागपूर शहराबद्दलहि उपस्थित होईल, अशी भीति मला वाटते ! आम्हाला हिंदीचा गौरव होत असल्याबद्दल यत्किंचित्हि विषाद वाटत नाही. पण, तो गौरव मराठी जनतेच्या मातृभाषेच्या विकासाला बाधक होतां कामा नये येवढेंच आमचें पाहणें आहे. हिंदी भाषेच्या मगटीवर, कदाचित् न कळत होत असलेल्या नागपुरांतील या आक्रमणाला आळा घालण्याचा एकच मार्ग आहे. तो मार्ग म्हणजे संघाचें ' विदर्भ साहित्यमंदिर ' या राजधानीच्या शहरांत स्थापन करून मराठी भाषेच्या व्यासंगाचें, विकासाचें आणि चळवळीचें प्रभावी केंद्र नागपूर शहरांत निर्माण करणें, हा होय ! नागपूर शहर जर महाराष्ट्रांत राहावें अशी आपल्याला तळमळ लागलेली असेल, तर आतां आपण हजारोंनी विदर्भ साहित्यसंघाचे सदस्य होऊन व त्याला बलवान् करून विदर्भ साहित्यमंदिराची योजना मूर्तस्वरूपाला आणून दाखविली पाहिजे. आम्हाला हिंदीविषयी कोणत्याहि प्रकारचें अप्रेम नाही. पण, लोकराज्याच्या स्थापनेबरोबर, भाषावार प्रांतरचना न झाल्यामुळे, आमची मायबोली जगविण्याचा महान् प्रश्न आज आमच्यापुढे उभा राहिलेला आहे. तो प्रश्न जर वेळींच दक्षता घेऊन आम्ही सोडविला नाही, तर पुढल्या दहा वर्षांत या प्रांतांतील मराठी जनता आणि तिची मायबोली यांचें भवितव्य काय होईल, याची कल्पनाहि मला करवत नाही !

दुहेरी संकट

या मध्यप्रदेशांत मराठी भाषा व मराठी जनता यांच्यावर जें संकट आलें आहे त्याचें स्वरूप दुहेरी आहे. राष्ट्रभाषा-विस्ताराच्या आवरणाखालीं अविवेकी हिंदीभाषी लोकांकडून येणारें संकट आणि राष्ट्रभाषेला भारतीय संघराज्यांत मानाचें स्थान प्राप्त होणार म्हणून आपल्या मायबोलीकडे दुर्लक्ष करून हिंदी भाषा आत्मसात करण्याकडे मराठी लोकांचाच जो जोराचा कल होऊं लागला आहे, त्यामुळे ओढवणारें संकट. भारतीय राजकारणांत पुढे येण्याची आकांक्षा, सरकारी नोकऱ्या मिळविण्याची इच्छा इत्यादि गोष्टी, मराठी लोकांचेंच मराठीच्या अभिवृद्धीकडे दुर्लक्ष होण्यास कारणीभूत होऊं लागल्या आहेत.

याचें एक नमुनेदार उदाहरण म्हणजे आचार्य दादा धर्माधिकारी यांच्यासारख्या गांधीवादी महाराष्ट्रीय विचारवंताला भारतांतील भाषाभाषांचा संघर्ष इतका भयानक वाटूं लागला आहे कीं, तो टाळण्यासाठी सर्व प्रांतीय मातृभाषा नष्ट होऊन भारतांत एकच राष्ट्रभाषा रूढ होणें त्यांना इष्ट वाटूं लागलें आहे.

दादांची ही दृष्टि विशाल मानवतावादी व राष्ट्रैक्यवादी भासत असली, तरी ती पूर्ण अवास्तव आहे. भारताच्या एकराष्ट्रीयत्वाचा व विशाल मानवतावादाचा प्रचार मराठी साहित्यानें जितक्या प्रभावी रीतीनें केला आहे, तितका क्वचित्च कोणत्या भाषेनें केला असेल. एक-राष्ट्रीयत्वाचे व विशाल मानवतेचे धडे घेण्यासाठी कोणत्याहि नव्या भाषेची दीक्षा घेण्याचें मराठी जनतेला कारण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाही. ज्ञानोबापासून विनोबापर्यंतची मराठीची तेजस्वी व प्रतिभाशाली परंपरा या विधानाची सत्यता पटविण्यास पुरेशी आहे. उलट, मराठी भाषेचें विसर्जन घडवून आणण्यास कारणीभूत, होणारा राष्ट्रभाषाप्रसाराचा अतिरेकी व आक्रमक दुराग्रहच भारतीय ऐक्य खंडित करण्यास कारणीभूत होईल.

म्हणून, प्रश्न भाषाभाषांतील स्पर्धेचा नसून राष्ट्रभाषा व मातृभाषा यांच्यांत परस्पर सहकार्य व समतोलपणा निर्माण करण्याचा आहे. मातृभाषेचें नैसर्गिक व न्याय्य क्षेत्र आणि मर्यादा यांचें यत्किंचित्‌हि उल्लंघन न करतां केवळ आंतरप्रांतीय व्यवहारापुरताच राष्ट्रभाषेचा उपयोग काटेकोरपणे मर्यादित केला गेला पाहिजे. हिंदीभाषी लोक ही मर्यादा या प्रांतांत उल्लंघू लागले आहेत म्हणूनच येथील मराठी भाषेचें भवितव्य संकटांत सापडलें आहे. नागपुर विश्वविद्यालयाच्या बाबतींत आणि हिंदी-मराठी सीमारेषेच्या विभागांत जें आज घडत आहे तें या संकटाची साक्ष पटवील.

नागपूर विद्यापीठांतील हिंदीचें प्राबल्य

नागपूर शहराप्रमाणेच नागपूर विद्यापिठाचाहि प्रश्न आपण लक्षांत घेतला पाहिजे. वस्तुत: महाकोसलमध्ये स्थापन झालेल्या सागर विद्यापीठाचें कार्यक्षेत्र मध्यप्रदेशाचा संपूर्ण हिंदी विभाग हें ठरविण्यांत आलें आहे. याचाच अर्थ असा की, नागपूर विद्यापीठ हें आतां मराठी विभागाचें मुख्य विद्यापीठ व्हावयास हवें. पण गेल्या तीन वर्षांत नागपूर विद्यापीठाच्या कारभारांत हिंदीचें प्राबल्य सारखें वाढत आहे. राज्यभाषा या नात्याने हिंदी भाषा शिकणें हें आमचें कर्तव्यच आहे; व महाराष्ट्रीयांना कोणीहि राष्ट्रीयत्वाचे धडे शिकविण्याची गरज नाही. पण, राज्यभाषा आणि मातृभाषा यांचे संबंध आणि कार्य हीं परस्परपोषक राहिली पाहिजेत. पण आज दुर्दैवाने नागपूर विद्यापीठांत निराळाच प्रकार दृष्टीस पडत आहे.

मराठी भागाचें हिंदीकरण

हिंदीच्या प्राबल्यामुळे आज या प्रांतांतील नागपूर, वर्धा, चांदा आणि भंडारा या चारी जिल्ह्यांवर हक्क सांगण्याची प्रवृत्ति हिंदीभाषीयांत वळावत चालली आहे. सरहद्दीवरील ज्या जिल्ह्यांत हिंदी आणि मराठी यांची सरमिसळ झालेली आहे त्या जिल्ह्यांतून जुन्या मराठी शाळा बंद करून त्याऐवजीं हिंदींतून प्राथमिक शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू आहे. भाषावार प्रांतरचना न झाल्यामुळे राज्यभाषा बनलेल्या हिंदीचें प्रांतिक भाषांवर आज सर्रास आक्रमण सुरू झालें आहे. आक्रमणाच्या या निरनिराळ्या प्रकारांना विदर्भ साहित्य संघाने आळा घातला पाहिजे; व मराठीचे तालुके, जिल्हे आणि जनपद हे अ-मराठी होणार नाहीत, यासाठी-प्रयत्न केले पाहिजेत. या बाबतींत जर आपण जागरुक राहिलों नाही, तर मुंबईसाठी सार्वमत घेण्याचा प्रश्न जसा अलीकडे उद्‌भवला आहे, तसाच नागपूरच्याहि बाबतींत उद्‌भवेल, हें लक्षांत ठेवा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हा जीवन-मरणाचा प्रश्न आहे

आज आपल्यापुढे जो प्रश्न आहे, तो आत्मरक्षणाचा व जीवनमरणाचा आहे. या वेळीं जर आपण संघटित होऊन मराठीच्या रक्षणासाठी योग्य उपाययोजना केली नाही तर आपण सांस्कृतिक दृष्ट्या नष्ट होऊन जाऊं. हिंदुस्थानांत अनेक भाषा आहेत; व प्रत्येक समाजाला आणि प्रांताला आपल्या भाषेचा अभिमान वाटण्यांत आणि तिच्या उत्कर्षासाठी झटण्यांत कोणत्याहि प्रकारचें अराष्ट्रीयत्व नाही. प्रांतिक भाषांवर हिंदीचें कोणत्याहि प्रकारचें आक्रमण होऊं नये, म्हणून हिंदीभाषी-यांनीच खरोखरी झटलें पाहिजे. कारण राष्ट्रभाषेचा विकास परस्पर सहकार्याने आणि परस्परविश्वासानेच व्हावयाचा आहे. पण ही जाणीव दुर्दैवाने हिंदीभाषीयांत नसल्यामुळे मराटीच्या रक्षणाचा प्रश्न आज उत्पन्न झाला आहे. मला आशा आहे की, विदर्भ साहित्यमंदिराची योजना यशस्वी करून या प्रांतांतील जनता मराठीचं प्रबल केंद्र नागपुरांत निर्माण करील. हें कार्य यशस्वी करण्यासाठी समंजस व समतोल बुद्धीच्या हिंदीभाषी नेत्यांचेंहि सहकार्य आपल्यास मिळवावें लागेल. असें झाल्यास आपलं विदर्भ साहित्य मंदिर हें हिंदी-मराठी जनतेच्या परस्पर सहकार्याचें व विश्वासाचें प्रतीक ठरेल आणि नव्या सांस्कृतिक आन्दोलनाचें स्फूर्तिस्थान होण्याचा मान त्याला मिळेल.

卐

'युगवाणी'ची छपाई

'युगवाणी'ची छपाई आकर्षक व नीटनेटकी होत असल्याचें विदर्भ साहित्य संघाच्या कित्येक सभासदांनी लिहून कळविलें आहे.

मराठीच काय, पण इंग्रजी, हिंदी भाषेंतील आकर्षक व निरनिराळ्या डिझाइनची सुबक छपाई आमच्या मुद्रणालयांत होत असते.

वेळेवर काम, सुंदर ग्रंथमुद्रण, उत्कृष्ठ बांधणी हीं आमचीं वैशिष्ट्यें आहेत.

हरिहरेश्वर मुद्रणालय, महाल चौक, नागपूर शहर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नादलुब्धाच्या स्मृतिलहरी— ५

अब्दुल करीम खाँसाहेब

मधुकर श्रीधर मंगरूळकर

☆

'गोपाला मेरी करुणा क्यौं नहीं आ ऽ ऽ ये—'

आर्त स्वरांत खाँ साहेबांनी घातलेली ती साद आजन्म विसरणें शक्य नाही. आज एक तपाहून जास्त अवधी लोटला, पण जणू खाँ साहेब अजून माझ्या कानांत गात आहेत इतक्या त्या लकेरी ताज्या आहेत.

मला वाटतें १९३६ साल होतें आणि मार्चचा महिना असावा तो. खाँ साहेबांचा कित्येक वर्षांनंतर नागपूरांत, त्या वेळच्या व्यंकटेश थिएटरमध्ये जलसा जाहीर झाला होता. दुसऱ्या दिवसापासून आमच्या नागपूर युनिव्हर्सिटीच्या वार्षिक परीक्षा सुरु होणार होत्या. इतका चमत्कारिक योगायोग कधी आल्याचा मला आठवत नाही. खाँसाहेबांचें झालेलें वय, नागपूर हें असें बाजूच्या वाटेवर पडलेलें, पुन्हा गाणें ऐकायला मिळतें की नाही याची शंका, या साऱ्या गोष्टी थिएटरकडे ओढून न्यायला पुरेशा होत्या. पण परीक्षा ! रात्रभर गाण्याचें जागरण करून, दुसरे दिवशी प्रश्नपत्रिका पाहून तसाच दाहो फोडायची वेळ आली म्हणजे !......पण या मानसिक द्वंद्वांत अखेर खाँसाहेबांच्या गाण्याच्या मोहिनी-चीच सरशी झाली. शिर सलामत तो पगडी पचास या न्यायाप्रमाणे हम सलामत तो परीक्षा पचास, पण खाँसाहेब आज गेले म्हणजे पुन्हा कशाला नजरेला पडतात असें वाटलें. आमचें कलाप्रेम उतू जात होतें म्हणा किंवा कसेंहि म्हणा, एक रात्र अभ्यासाला आणि थर्मासला सुट्टी द्यायचें ठरलें. थिएटरवर हजर झालों. आमच्याचसारखा अविचार करून बरीच मंडळी आमच्या अगोदर जमून बसली होती. हळूहळू पडदा वर गेला. स्टेजवर एक लहानसें व्यासपीठ तयार केलें होतें. लाल मखमलीचा गालिचा त्यावर आंथरलेला होता. त्यावेळी तबलजी कोण होता हें आज सांगता येत नाही, पण हार्मोनियमच्या साथीवर श्री. कपिलेश्वरी होते. तंबोऱ्यावर खाँसाहेबांचे शागिर्द बसलेले होते. खाँसाहेबांची जागा अद्यापि रिकामी होती. पण ते येऊन बसायच्या अगोदरच तंबोऱ्यांच्या स्वरांचें साम्राज्य सुरू झालें होतें. कपिलेश्वरींच्या पेटीचे मंजुळ सूर हळूच इकडे तिकडे हिंडणाऱ्या मुखरिणीसारखे फिरत होते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वरलहरी थंडावल्या. टाळ्याचा कडकडाट झाला. मीं समोर पाहिलें एक फाटक्या अंगाचा गृहस्थ किंचित् मान झुकवून प्रेक्षकांना अभिवादन करीत होता. हेंच का खाँसाहेब ! गायन सम्राट !

कसेंतरी मुंडासें डोक्याला बांधलेलें, साधासाच कोट अंगात अडकविलेला, आणि तसलेंच एक साधें आखुड धोतर नेसलेलें; हा त्यावेळचा खाँ साहेबांचा पोशाख! त्यांच्या त्या व्यक्तिमत्वाचा माझ्यावर मुळीच प्रभाव पडला नाही.

त्यांनी बैठकीस सुरवात करतांना उजव्या हाताने हळूंच डाव्या कानाला स्पर्श केला आणि संथ पाण्यावर दिवा सोडावा इतक्या अलगद साऽ लावला. अहाहा !! आनंदाची एक ऊर्मि जणु अंगातून निघून गेली. पाताळातून शेषाने दिलेल्या हुंकाराची जणु सखोलता त्या षड्जांत होती. सप्तरंग धारण करणाऱ्या धवलरंगा सारखे त्या स्वरशब्दांचें स्वरूप ! न बोलताच कितीतरी शब्दांचा साक्षात्कार झाला. ‘ ॐ ’ या शब्दांत जसें एखाद्या तत्त्वज्ञाला ब्रम्हांड भरलेलें दिसावें त्याप्रमाणे मला त्या वेळी तो षडज वाटला. खाँसाहेबांनी एकदा श्रोतृवृंदाकडे नजर लावली आणि खुल्या आवाजात नि़ ध़ नि़ हे स्वर घ्यायला सुरवात करताच पुरिया राग आकार धारण करू लागला. खर्जात जितके खाली स्वर लावता येतील तितका आवाज खाली उतरवून, त्यानी पुन्हा एकवार षड्ज मिळविला आणि ‘ नोम् तोम् ’ ला सुरवात केली. कोमल रिषभ, गांधार, तीव्रमध्यम या स्वरांच्या खुंट्यावर जणु त्यानी पुरियाची चादर अडकवून दिली होती आणि वारा आला म्हणजे त्या चादरीवर हलुहलु लहरी उमटत. ती संथ स्वरांची बढत ! वारा पडलेला असला तरी शिडांत एकदा वारें भरलें म्हणजे तारूं संथ, धिरे धिरे तसूं तसूं पुढे सरकतें तशी बढत सुरू होती. खाँसाहेब मध्येच श्रोतृवृंदाकडे नजर लावीत. आपण जी काही कारवाई करीत आहोंत ती प्रेक्षकांच्या पचनीं पडते आहे की नाही हें जाणून घेण्यासाठी ते क्षणभर जणु कानोसा घेत होते. आपलें आवचें गाणें लोकांसाठी आहे, त्यांच्या मगदूराला झेपेल इतकेंच काम पुरें. लोकांशी हात मिळता घ्यायचा, त्यांच्याशी दोन हात करायचे नाहीत ही समज या गायनसम्राटाला होती तर एकंदरीत ! आपलें प्रत्येक पाऊल ठेक्यांत पडतें आहे की नाही हें पाहून पदक्षेप करणाऱ्या नर्तिकेच्या पैंजणाचे रुण झुण निनाद इच्छित परिणाम केल्या शिवाय कसे राहतील ? लोकांची उत्सुकता फार न ताणतां, त्यांनी नि़ रे़ ग मं ध ग मं ग असा आलाप घेऊन मोठ्या ख्यालाच्या तोंडाला हात घातला—“ पिया ऽ ऽ ऽ गुण वीं ऽ ऽ ऽ ता—” तबलजीने एक मुखडा मारून “वींऽ” या शब्दावर एकतालाचें तोंड पकडलें. हा प्रवास धिरे धिरे चालला होता. प्रियकराच्या प्रत्येक गोष्टींतलें चातुर्य ‘ निसदिन ’ कसें प्रत्ययाला येतें याचें रसीलें वर्णन त्या चीजेत होतें ‘...मी मात्र कोरडी, माझ्यांत एकहि गुण नाही पण पिया मात्र गुणवंत...’

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हे सारे भाव खाँसाहेबांच्या गळ्यांतून बाहेर निघत होते. आणि कहाणी सांगत असतांना श्रोत्याने हुंकार द्यावा त्याप्रमाणे 'धिन् धिन्...' चालला होता आणि मध्येच आश्चर्य वाटलें म्हणजे एकाद्याने 'अरे वा ! खरंच' असे उद्गार काढावे, त्याप्रमाणे 'पिया असा असा गुणवंत आहे' असें म्हणतांच जणु तबला समेदाखल आश्चर्योद्गार काढीत असे ! गोष्ट ऐन रंगात यावी अन् एखाद्या अचपल प्रवृत्तीच्या पोराने मध्येच बडबड करावी किंवा क्रिकेटचा खेळ ऐन रंगात येताच एखाद्या कुलंग्या कुत्र्याने रंगणांत येऊन धांव घ्यावी म्हणजे बेरंग होतो, त्याप्रमाणे तबलजीने मध्येच धिरकिड् करून आपलें अस्तित्व दाखविलेंच तर खाँसाहेब किंचित् वाकडी नजर करून तिकडे बघत आणि तो इषारा पुरे होई. जणु एखाद्या जातीवंत घोड्याची बग्गी संथपणे चालली आहे, मधून मधून टप् टप् टप् टप् टापांचा तालबद्ध आवाज येत आहे. दोघांचा प्रवास एकमेकावर अवलंबून ! घोडा गाडीच्या पुढे गेला असें म्हणता यायचें नाही, की गाडी मागे राहिली असें कुणाला म्हणता यायचें नाही. संथ प्रवास बराच वेळ झाल्यानंतर 'शाम सुंदरकी' या छोट्या ख्यालाने त्यांनी सजावट सुरू केली. अध्यक्ष यायची वेळ तर होत आली आणि अजून तोरणें पताका पुष्कळ उरल्या आहेत, मग लहान मुलें मुली जशीं तोरणें घेऊन भराभर इकडे तिकडे पळतात त्याप्रमाणे तानांच्या सरी सुरू झाल्या. एक संपत नाही तर दुसरी—जणु निरनिराळ्या धातूच्या तारांच्या गुंडाळ्या उकलल्या जात होत्या आणि त्या आपापल्या अंगजात गुणधर्माप्रमाणे पुन्हा पूर्वस्थितीला येत होत्या. चांदीच्या, सोन्याच्या, पोलादाच्या—किती तरी प्रकारच्या —!

टाळ्यांचा कडकडाट झाला. मॅग्नेशियमची तार जळाली तरी डोळ्यासमोरचा प्रकाशाचा पुंजका लवकर दृष्टीआड होत नाही त्याप्रमाणे सारे प्रेक्षक दिपून गेले होते. खाँसाहेबांनी पुन्हा मान लववून त्या टाळ्यांचा स्वीकार केला. म्हणूनच की काय क्षणभर थांबलेल्या टाळ्या पुन्हा कड्कड् वाजल्या. जणु मघाच्याच टाळ्यांचा प्रतिध्वनि उठत होता.

त्यांनी तबलजीला दिलेल्या इशाऱ्यांत तरी, किती गंभीर अर्थ भरला होता ! तबलजीने जास्त वाजवूं नये, याचा अर्थ गायकाला तालज्ञान नाही असा का घ्यायचा ? छे छे ! मुळीच नाही. गायक गात असतो म्हणजे त्याच्या विचाराची एक विशिष्ट मालिका असते. ती सांखळी तुटली म्हणजे पुन्हा तशाच कड्या लवकर विणतां येत नाहीत. प्रतिपक्षाची फेरतपासणी करण्यांत सत्य तें बाहेर यावें या विचाराने वकील आपली पराकाष्ठा करीत असतो त्याप्रमाणे खरें रागस्वरूप बाहेर यावें, कलेकलेने विकसित होणारा चंद्रमा एकाच वेळी सगळ्या कलांनी विकसित झालेला दिसावा, कमल—कलिकेचें एकाच बैठकीत पूर्ण उमललेलें कमल दिसावें, हा त्या गायकाचा हेतु असतो. पण ही समज किती वादकांना असते ? गायनाच्या बैठकी ऐकायच्या असतात आणि त्या बरोबरच असल्या बारिक सारिक गोष्टी पहायच्याहि असतात.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खाँ साहेबांनी जेव्हा " नच सुंदरी करूं कोपा, सुरू केलें तेव्हा, एखाद्या निर्व्याज बालकाच्या चेहऱ्याचें स्मित प्रेक्षकांत पसरलें. कारण त्यांनी त्यांच्या मनीचें गुपित ओळखलें होतें. मराठी पदें बैठकींत गाणें यांत अपमानास्पद काय आहे ? चीज हिंदी भाषेतूनच म्हटली म्हणजे तिचें शास्त्रीय स्वरूप राहतें एरवीं नाही असा रागाचा दंडक थोडाच आहे ? मागे एकदा श्री. चितळ्यांच्या प्रेस मध्ये झालेल्या जगन्नाथ बुवा पंढरपूरकरांच्या बैठकीची मला आठवण येते. एका पोरवयाच्या मुलाने 'बुवा पद म्हणा' अशी सूचना करताच बुवांनी त्याच व्यास-पिठावरून जो गहजब केला तो माझ्या स्मरणांत आहे. सहसा गवयाला बैठकींत, त्याने विचारल्या शिवाय फर्माईश करू नये. कारण ती त्याच्या तज्ञेतीची गोष्ट आहे. आपल्याला काय येतें आणि त्यांतले उत्तम नग कोणते हें गायक ठरवून येत असेल नाही का ? मग त्याची पोतडी रिकामी होण्यापूर्वीच मध्ये मध्ये तोंड घालणें योग्य नाही. पण त्याबरोबरच प्रेक्षकांची कुवतहि ओळखण्याचें ज्ञान राग-ज्ञानाबरोबरच गायकाला असायला पाहिजे.

खाँ साहेब किती आर्जवून गात होते. 'रागाने तव तनु ही पावत किती कंपा' ही ओळ म्हणत असताना त्यांनी आपले दोन्हो खांदे किंचित हलवले व म्हटलें, 'नच सुंदरी......'

अर्थानुकूल गायन कसें करावें हें खाँसाहेब अगदी उत्तम तऱ्हेने ओळखीत असावे. कारण वरील पद चालू असतांना, त्यांनी साथ किंचित हळू करायची सूचना देऊन म्हटलें,

"यही चीज कोई कोइ लोग ऐसे भी गाते हैं—"

असें म्हणून प्रियकराने आपल्या पात्राला दाटण्याच्या आवेशांत, राणा भीमदेवी थाटांत पुन्हा एक ओळ म्हटली, 'नच सुंदरी करू कोपा—'

सारे लोक हंसले. जणु दुधावर जमलेली साय निघून पुन्हा दुधाची शुभ्र पातळी दिसूं लागली होती. प्रेक्षकांत किंचित शैथिल्य येत आहे असें लक्षांत येतांच एखादे हरिभक्तपरायण "पुडी" सोडून खसखस पिकवितात, त्याप्रमाणे अनेक हुन्नर खाँसाहेबांजवळ होते. पण या हरहुन्नरी कलावंतालाहि बनविणारा एक सवाई कलावंत निर्माण झाला होता याची कित्येकाना कल्पना नसेल. माझ्या एका गायक मित्रांनी सांगितलेली हकीकत जशीच्या तशी सांगतों. त्यांना ती खाँ साहेबांकडून कळली.

मुंबईच्या मुक्कामांत, एक मुसलमान गृहस्थ खाँसाहेबांना भेटायला आले. त्यांनी स्वतःचा परिचय करून देतांना आपण खाँसाहेबांना गुरु मानेलें आहे असें सांगून आपली खाँसाहेबांना घरी नेण्याची इच्छा आहे असें सांगितलें. खाँसाहेबांना त्यांची इच्छा मोडवेना. ते त्यांच्या घरीं गेले. समोर गॅलरींत मोठमोठे तंबोरे, दिलरुबे सतारी लोकांना दिसाव्या अशा अडकवून ठेवल्या होत्या. खाँसाहेबांनी विचारतांच त्यांनी आपली गायन शाळा असून, लोकांना कळावें म्हणून ही

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आयुषें हवाशीर टांगून ठेवलीं आहेत असें सांगितलें. घरांत गेल्यावर फोटोग्राफरला समोर पाहून खाँसाहेब म्हणाले,

"क्या बात है—!"

त्यांना सांगण्यात आलें की दोघांचा फोटो काढावा अशी आपली इच्छा आहे. त्याहि विनंतीत वावगें काही नव्हतेंच. खाँसाहेब व ते गृहस्थ एकत्र बसले. फोटोग्राफरने वन् टू, थ्री म्हणताच ट्रान्सफरसीन झाला. ते गृहस्थ एकदम उभे राहिले अन् फोटो असा निघाला की उभ्या असलेल्या त्या गृहस्थाचे पायावर बसलेल्या खाँसाहेबांचे हात आहेत. आणि त्या फोटोच्या भांडवलावर म्हणे त्यांनी बरीच माया जमविली आहे.

जन्माचे मुसल्मान पण वृत्तीने हिंदु असलेल्या या गानसम्राटाची अशी बेइज्जत करायची कल्पना ज्या मेंदूत जन्म पावली असेल त्याचा प्रकार कोणता?

पण याहि वागणुकीचा खाँसाहेबांच्या गायकीवर किंवा त्यांच्या विद्यादानावर परिणाम झाला म्हणता ? छे. खाँसाहेबांनी जणु समोरच्या अफाट श्रोतृसमुदायालाच उद्देशून 'नच सुंदरी करु कोपा' म्हटलें होतें. मग जनतेचा राग कितीसा वेळ तग धरून राहील ! लोक किती प्रसन्न होते हें सांगायला एक क्षुल्लक गोष्ट पुरेशी आहे. खाँ साहेबांनी 'पियाबिन ऽऽ नाही आवत चैन—' ही चीज सुरू केली तेव्हा टाळ्यांची फैर झडली त्यावरून कल्पना येईल. एका तळमळणाऱ्या विरहिणीचें चित्र त्यांनीं किती यथार्थतेने उभें केलें होतें. खाँ साहेबांच्या आवाजीत असीम गोडवा होता. डोळे लावून तो आवाज ऐकला म्हणजे सोळा सतरा वर्षांच्या कोवळ्या तरुणीचा तो आवाज असेल असें वाटे. अफाट मेहनत करूनहि त्यांच्या गळ्यावर यत्किंचितहि वाईट परिणाम झाला नव्हता. पण तो गोडवा एका विशिष्ट प्रकारचा होता. त्या गोडव्याला कारुण्याची झालर होती. खाँसाहेबांचा आवाज ऐकला म्हणजे मला शेलेच्या Our Sweetest songs are those that tell us of the saddest thoughts या उक्तीची आठवण होते. खाँसाहेब 'नच सुंदरी' सारखें शृंगारपूर्ण गीत गात असोत की पियाबिन नही आवत चैन सारखी कारुण्य पाझरणारी चीज गात असोत त्यांच्या या कारुण्याचा सतत भास होत असे. किंबहुना कारुण्य हा त्यांच्या गायकीचा स्थायिभावच होता असें म्हणायला मुळीच हरकत नाही. मग जेव्हा ते, 'गोपाला ! मेरी करुणा क्यों नहीं आये' सारखी चीज म्हणून टाहो फोडत तेव्हा मीरेच्या हृदयांत किती जबरदस्त खळबळ माजली असेल याची तंतोतत कल्पना येते. खाँसाहेबांना जणु त्या त्या भूमिकांशी तादात्म्य पावण्याची म्हणजे परकाया प्रवेशाची किमयाच साध्य झाली होती. त्या लकेरी माझ्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या आहेत. खाँ साहेबांची आठवण झाली म्हणजे दिलासा म्हणून त्यांच्या रेकॉर्डे वाजवाव्या, पण हृदयाचें समाधान होत नाही. उलट या आवाजाचा धनी आज आपल्यांत नाही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या जाणीवेने मन अधिकच खिन्न होतें. त्या बैठकींत गायलेल्या वसंतातील 'नबीके दरबार' या ख्यालाची व 'फगवा ब्रिज खेलन' चीजेची आठवण कोण विसरेल ? आणि "जमुनाके तीर—?" ही भैरवी कधी संपू नये असें वाटणारें तें एक गोड स्वप्न होतें. सारी उमर सुखाचा संसार करून थकलेल्या एखाद्या जीवाने, सुखसमाधानयुक्त पण निरोप घेण्याच्या दुःखद आठवणीने भारलेल्या गळ्याने तें गीत आळवावें तसें मला वाटलें.

"जमुनाके तीऽऽर—"

दिल्या आवाजात गायलेल्या त्या भैरवीची परिणामकारकता काही औरच. स्वर्जांत भरलेले नि, ध चे असंख्य प्रकार अखेर मध्य सप्तकाच्या षड्जाला येऊन मिळाले, म्हणजे एखाद्या वृक्षाला लपेटलेल्या वेलींची आठवण येत असे. सा रे रे या तीनच स्वरांचा उपयोग करून जेव्हा ते जमुनाऽऽऽ जमुऽऽनाऽऽ असे आलाप घेत तेव्हा तर अंगावर रोमांच उठत.

ताजमहाल हें जसें शहाजहानचें एक रम्य स्वप्न होतें तसेच खाँ साहेबांचें त्या दिवशीचें गाणें माझ्या आठवणींत ताजमहाला सारखें अक्षय ठसलें आहे. कारुण्याने या अक्षर सौंदर्यांत अधिकच भर पडली आहे. आम्हांला वाईट वाटतें तें एवढेंच की परमेश्वराने आम्हांला इतक्या उशीरा जन्माला का घातलें ? नाहीतर खाँ साहेबांच्या कलेचा अधिक आस्वाद घेता आला नसता का ? गोपाला ! मेरी करुणा क्यौं नही आयेऽऽ—!

卐

ठाकूर आणि कंपनीचीं
महत्त्वाचीं प्रकाशनें

१. फुलांची ओंजळ ('बी' कवींचा काव्यसंग्रह)
२. पाकिस्तानी प्रवृत्तीचा प्रतिकार (आचार्य दादा धर्माधिकारी)

☆ या पुस्तकांवाचून तुमचा ग्रंथसंग्रह उणा राहील ☆

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नवी मळवाट (काव्य-समीक्षण) नारायण गणेशपूरकर

*

अलीकडे काव्य-प्रांतांत जुन्या आणि नव्या काव्यासंबंधी वाद उपस्थित होऊन नामवंत साहित्यिक आपलीं भिन्न भिन्न मतें प्रदर्शित करीत आहेत. ज्या ज्या काळांत जें जें काव्य जन्माला येतें त्या त्या काळांत तें तें काव्य नवीनच असतें खरें पण आजचें तें नवीन आणि कालचें तें जुनें असें स्वरूप त्याला आपोआपच येतें. म्हणून जें काव्य ज्या काळांत प्रसृत होतें तें त्यावेळीं कितपत प्रगतिशील असतें हें पाहणेंहि अत्यावश्यक असतें. कल्पना आणि भावना यांचे तारेवर काव्याचीं चाकें ठेवून काव्याची कसरत हृदयंगम आहे असें म्हणणारे आणि वैचारिक बैटकीला महत्व देऊन काव्याद्वारे कांहींतरी मार्गदर्शन झालें पाहिजे असें म्हणणारे यांत आज बरीच फारकत झालेली आढळत आहे. काव्याला लागणारे सर्व गुण जमेस धरून वैचारिक बैटकीच्या मंचकावर जें काव्य आज विशिष्ट हेतु साधण्यासाठी सुसज्ज झालें आहे त्यालाच आज 'नवकाव्य' म्हणणें इष्ट होईल. असें मत व्यक्त करतांना प्रचारकी थाटाचें किंवा पाश्चिमात्य संस्कृतीचें अवडंबर माजविणारें किंवा उत्तान शृंगारपूर्ण असें स्त्रियांचें भडक चित्र रंगविणारें किंवा इंग्रजी शब्दांनी गजबजलेलें काव्य तें 'नवकाव्य' असें मात्र आम्ही म्हणणार नाही. उलट, अशा काव्याचा आम्ही निषेधच करूं. वस्तुस्थितीचें दर्शन घडवून जनतेसमोर आजचें जग ठेवणें व विचारांना गति देऊन मानवी मूल्यांची प्रतिमा साकल्याने उभी करणें हें जो कवि आज साधूं पाहतो तोच कवि 'नवकाव्या'चा जन्मदाता आहे.

श्री. मुक्तिबोध यांच्या 'नवी मळवाट' ह्या काव्य संग्रहाचा परामर्श घेण्यापूर्वी त्यांनी स्वतःच ह्या संग्रहाला जोडलेल्या मार्मिक प्रस्तावनेंतील 'नवकाव्या' संबंधीची सीमारेषा लक्षांत घेणें आवश्यक आहे. "पुरोगामी नवकाव्य नुसतें सामाजिक परिस्थितीचें चित्रणच करूं पाहत नाही तर त्या समग्र सामाजिक परिस्थितीवर आरूढ होऊन, तीस बदलूं पाहतें. म्हणूनच नवकाव्य हें अत्यंत ज्वलंत आणि परिस्थितीस बदलावयास लोक कटिबद्ध होतील अशा प्रखर निष्ठेने सरस निर्माण होऊं पाहात आहे." कवीने आपल्या प्रस्तावनेंत नवकाव्याचें अशा स्पष्ट शब्दांत स्वरूप व्यक्त करून मध्यमवर्गीयांनी निर्माण केलेले काव्यांतील 'व्यक्तिवादी अहंवादी' आणि 'समाजवादी मानवतावादी' असे दोन विचारप्रवाह सूचित केले आणि मग "नवकवींचा दृष्टिकोण अत्यंत व्यापक आणि निष्ठा पुरोगामी असल्यामुळे विषम जीवनामुळे निर्माण झालेल्या जीवनांतील अनेक पैलूंवर प्रकाश पाडणारीं अनेक अनुभूतींचीं सत्यें ते आपल्या काव्यांतून प्रकट

(कव्हर पान ३ वर पाहा)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हरणखेडकर; कु. सुधा दत्तात्रेय वैद्य; कु. विमल गणेश भशुंडी; जगन्नाथ आशन्ना नागुलवार.

वर्ग २ रा. गणेश दत्तात्रेय सारोळकर; वसंत गजानन अलोणी; मधुकर नीळकंठ देशमुख; महादेव सखाराम डहाके; कु. पुष्पा गोविंदराव महाजन; नीळकंठ रामकृष्ण इंगळे; आनंदराव कृष्णराव देशमुख; मधुकर तानबा राजूरकर; शांता बळवंतराव उपाध्ये; पंढरीनाथ रामचंद्र राउत; मणिरामसिंग सुंदरसिंग पवार; अण्णा राजारामजी सावरकर; कु. सरोज नरहर आगाशे; आत्माराम पांडुरंग कदम; माधव विश्वनाथ कुलट; हरिदास बक्षी बनकर; भावगीर देवगीर गिरी; रामकृष्ण विश्वनाथ कोलते; बाबाराव सीताराम सिमै; कु. सुधा गोपाळ दीक्षित; मनोहर नानाजी कंत्रोजवार; भाऊराव सोनबाजी बावने; किसन दयाराम कटाळे; माधव राजय्या मल्लुरवार; बिठोबा रावजी खोबरागडे; वसंत लक्ष्मण चुन्ने; मनोहर शामराव पाठक; वासुदेव रामचंद्र तराळे; दिनकर धोंडीराम तराळे; लक्ष्मण किसन गणोरकर; सौ. कुसुम दत्तात्रेय देशमुख.

वर्ग ३ रा. प्रभाकर श्रीधरराव दाढी; कु. सुमन विश्वनाथ आठवले; मधुकर श्रीराम खवले; मुकुंद रंगनाथ कुळकर्णी; सुमंगला आत्माराम वैराळे; अजाब कृष्णराव जाचक; शरद व्यंकटेश देशमुख; नीळकंठ तुकाराम भुते, बाळा बापुराव आष्टनवार; गुलाब राजाराम भगत; विठ्ठल खुशाल सातवकार; दामोदर वामन इंगळे; वामन गणपत मुळतकर; शामराव भिवाजी ठणारे; लीला गोविंदराव मुळे; रामराव पांडुरंग वाईकर; वामन पुंडलीक मोयर; विठ्ठल लक्ष्मण आवारी; वामन तुकाराम भारंबे; कु. कुमुदिनी लक्ष्मणराव भागवत; गोविंद नारायण महाजन; हिंमतराव नारायण देशमुख; अब्दुल अझीझ शेख जमाल कुरैशी; विठ्ठल मुकुंद खोबरागडे; हरिहर शंकर देशपांडे; मनोहर गणपत गोरे; श्रीराम दत्तू दुटे; गणेश विष्णु अत्रे; पुरुषोत्तम उमाकांत पाठक; रामचंद्र नथुजी राठोड; मनोहर ओमाजी बंडावार; तारा नारायण पिंपरकर; एकनाथ रामजी खाडे; माणिक लक्ष्मण पेटे; प्रभाकर नथ्थु टिकले; विठ्ठल महादेवराव शेंबडे; अतुलचंद्र दत्तात्रेय मोहिले; रामकृष्ण भुमन्ना चंदावार; रामभाऊ भाऊजी खिर्डेकर; कु. सिंधु रामचंद्र फडणवीस; गुलाब गणपत कडू; कु. प्रमिला जानराव नेरपे; हरिनारायण गोपाळ मानकर; वामन गोपाळ मांडवगडे; पुंजाजी छन्नू इळदे; वसंत बापुराव पखाले; नामदेव सदाशिव टापरे; गजानन अंबादास लुतडे; आनंदकुमार मुकुंदराव व्यवहारे; मनोहर गजानन ढोमणे; नामदेव जगन्नाथ इमारते; मुकुंद दत्तात्रेय पारनाईक; नारायण सीताराम लुले; शेख इस्माइल शेख चांद; पुष्पलता फ्रॅन्सिस वूड; मधुकर पुरुषोत्तम आपटे; मधुकर विठोबाजी सदन; पंजाब शंकर जवादे; विष्णु शंकर काटेकर; विष्णु रामचंद्र

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काणे; श्रीधर नारायण मंगरूळकर; दिनकर रामचंद्र जोशी; जगन्नाथ नारायण व्यास; रामराव यादव नासिरकर; रामचंद्र श्रीधर बोकार; प्रमिला गोविंदराव मुळे; शेषराव सदाशिव देशमुख; वासुदेव जगनराव गावंडे; बापुराव हरिश्चंद्र गावंडे; तुकाराम किसन गगोरकार.

मराठी प्रारंभ

वर्ग १ ला. (गुणानुक्रमे) सौ. निर्मला बोधनकर; रजनी गणपतराव देव माणिक विठोबाजी एडाखे; रामगोपाल किसनलाल पांडे; वसंत शामराव चौधरी.

वर्ग २ रा. श्रीधर मारोतराव पाचघरे; कुंदा जयवंत जकातकार; विनायक विष्णुपंत गोखले; लीला विश्वनाथराव आठवले; शालिनी माधवराव कोरडे; प्रमिला भिकाजी धाकस; भास्कर गणेश भृशुंडी; यशवंत गणपतराव पारखी; विमल गणपतराव हरदास; शरद देवीदास शिरपूरकर; सुधाकर जनार्दन गोडबोले; गंगा मोहनराव मोहवे; सुधा शंकरराव भूत; गोकुलदास शंकरलाल नवगणे; त्रिंबक बाबाराव लांडगे; भालचंद्र विनायकराव पांडे.

वर्ग ३ रा. महादेव नारायणराव खोडे; विठ्ठल नथुसा रत्नपारखी; तारा मोतीबाबा रणनवरे; उषा अनंतराव पंडितराव; कुमुद आत्माराम मार्केडेयवार; रामदास यादवराव कड्ड; पुष्पा गजाननराव देव; दिगंबर रामचंद्र वाघमारे.

मराठी प्रवेश

वर्ग १ ला. (गुणानुक्रमे) कु. मीनाक्षी रघुनाथ पिंगळे; अशोक हणमंतराव सगणे.

वर्ग २ रा. घनश्याम रामचंद्र गोपा; कुमारसिंह जगजीवनराम कदम; पुरुषोत्तम केशवराव कदम.

साहित्य विनीत या परीक्षेत पहिल्या वर्गात सर्वात जास्त गुण मिळविल्याबद्दल श्री. वामन सीताराम राऊत (वरुड केंद्र) यांना "प्रा. ना. कृ. दिवाणजी पारितोषिक" देण्यांत आलें आहे.

वि. भि. कोलते
संचालक
परीक्षा समिति. वि. सा. संघ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

चांदा येथील ता. ४ व ५ फेब्रुवारी १९५० रोजीं विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाच्या बाराव्या अधिवेशनाचा अहवाल :—

शनिवार ता. ४ रोजीं सकाळीं ११ वाजतां प्रतिनिधि निवासस्थानीं नव्या व जुन्या कार्यकारी मंडळांची डॉ. मा. गो. देशमुख यांचे अध्यक्षतेखाली संयुक्त सभा भरून तींत खालील ठराव मंजूर झाले—

(१) जमाखर्चाचा तक्ता तयार नसल्यामुळे तो मार्च महिन्यांतील १५ तारखेपर्यंत तयार करण्यांत यावा, व सन १९४८ व १९४९ चा सर्व जमाखर्च ऑडिटर कडून तपासून घेऊन सादर करावा.

(२) संपादक युगवाणी यांनी ता. ३१-१-५० पर्यंत केलेल्या रु. ४४२-४-० चा खर्च मंजूर करण्यांत आला.

(३) वि. सा. संघाची सांप्रत असलेली घटना दुरुस्त करण्यात यावी. याकरिता ही सभा श्री पु. य. देशपांडे, प्रा. श्री. ना. बनहट्टी व डॉ. वि. भि कोलते अशा तिघांची एक उपसमिति नेमीत आहे. या समितीला आणखी कांही सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार ही सभा देत आहे.

यानंतर नवीन कार्यकारी मंडळाच्या सभेचें कामकाज श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे अध्यक्षतेखाली होऊन तींत खालील निर्णय घेण्यांत आले—

(१) घटनेनुसार अध्यक्षांनी श्री. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे आणि श्री. प. श्री पटवर्धन यांना नवीन वर्षाच्या कार्यकारी मंडळावर नियुक्त केलें.

(२) "प्रांतांत संघाचें व मराठी भाषेचें महत्त्व व व्याप वाढविण्याच्या दृष्टीने व विशेषतः विद्यमान परिस्थितीकडे लक्ष देतां संघाचें दप्तर आणि कचेरी नागपूर येथे नेण्यांत यावी.

कार्यकारी मंडळाच्या या शिफारसीस साधारण सभेची मजुंरी घेण्यांत यावी." (सर्वानुमतें मंजूर)

(३) कार्यकारी मंडळांतील पदाधिकाऱ्यांची निवड—

उपाध्यक्ष—श्री. पु. य. देशपांडे

कोषाध्यक्ष—श्री. बाळासाहेब ढवळे

सरचिटणीस—श्रीमती शकुंतलाबाई दिवाणजी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५०
मार्च

चिटणीस—श्री. रा. पु. सगदेव, (नागपूर)
चिटणीस—श्री. प्र. ना. खोडे (अकोला)
,, ,, शं. ना. सहस्रबुद्धे (उमरावती)
संचालक, परीक्षा समिति—प्रा. डॉ. वि. भि. कोलते
संपादक, युगवाणी—प्रा. वा. कृ. चोरघडे.

(४) वि. सा संघासाठी नागपूर येथे जागा घेऊन तीवर विदर्भ साहित्य मंदिर बांधण्यांत यावें. यासाठीं खालील दोन उपसमित्या मुक्रर करण्यांत आल्या—

(अ) निधि समिति—

१. न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति (अध्यक्ष)
२. श्री. आचार्य दादा धर्माधिकारी
३. ,, डाह्याभाई मुतारिया
४. भिकुलालजी चांडक
५. ,, पु. य. देशपांडे
६. ,, आप्पाजी गांधी
७. श्रीमंत राजे प्रतापसिंहराव भोंसले
८. श्री. बाबासाहेब देशमुख (पारवेकर)
९. वीर वामनराव दादा जोशी
१०. श्री. भाऊजी पागे
११. ,, ए. रा. महाजनी
१२. ,, द. वा. शिदोरे
१३. ,, अण्णेगिरी
१४. ,, बाळासाहेब ढवळे (आमंत्रक)

(ब) मंदिर समिति—

१. न्या. मू. के. तु. मंगलमूर्ति—अध्यक्ष
२. श्री. फरजगांवकर
३. ,, थेरगांवकर
४. ॲड. श्री. गो. घुले
५. श्री. बाबासाहेब भोंसुले
६. डॉ. य. खु. देशपांडे
७. श्री. आ. रा. देशपांडे
८. श्री. म. श्री. मंगरूळकर
९. ,, दीनदयालजी गुप्त
१०. ,, ए. श्री. पटवर्धन—आमंत्रक

वरील दोन्ही समित्यांवर आणखी सभासद नियुक्त करण्याचे अधिकार संघाध्यक्षांना देण्यांत येत आहेत.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे नागपूर येथील चिटणीस (श्री. रा पु. सगदेव) हे दोन्ही समित्यांवर अधिकारपरत्वें सभासद म्हणून राहतील.

(सर्वानुमते मंजूर)

(५) युगवाणीचे संपादक श्री. वा. कृ. चोरघडे यांना संपादनाच्या खर्चासाठी दरमहा पाऊणशें रुपये मंजूर करण्यांत आले व या कामासाठी मदतनीस नेमण्याचा अधिकारहि त्यांना देण्यांत आला. (सर्वानुमते मंजूर)

दुपारी चार वाजतां वि. सा. संघाची साधारण सभा भरून तींत खालील निर्णय करण्यांत आले—

(१) सरचिटणीस प्रा. ना. कृ. दिवाणजी यांच्या अकाली व अपघाती मृत्युबद्दलचा दुखवटयाचा ठराव सर्वांनी उभे राहून मंजूर केला.

(२) सन १९४९ चें अहवालवाचन होऊन तें मंजूर करण्यांत आलें.

(३) सन १९४८ व १९४९ चे जमाखर्चाचे तक्ते तयार नव्हल्यामुळे ते सर्व ता. १५ मार्च १९५० पर्यंत तयार व ऑडिट करवून सादर करण्यांत यावे.

(४) 'वि. सा. संघाच्या विनीत परीक्षेत दरवर्षी पहिल्या वर्गात पहिला येणाऱ्या विद्यार्थ्यास पंचवीस रुपयांचें " कै. ना. कृ. दिवाणजी " पारितोषिक पुस्तकांच्या रूपाने द्यावें ' या परीक्षासमितीने घेतलेल्या निर्णयाला मान्यता देण्यात आली.

संध्याकाळी ठीक ५ वाजता सिटी हायस्कूलचे प्रांगणांत संमेलनाला सुरवात झाली. स्वागतगीतानंतर चांद्याचे सुप्रसिद्ध नागरिक श्री. बाबासाहेब देशमुख यांचें स्वागताध्यक्ष या नात्याने भाषण झालें. त्यानंतर संमेलनाचें उद्घाटन आचार्य दादा धर्माधिकारी यांनी केलें, आणि डॉ. कोलते यांनी डॉ. देशमुख यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती केली. तिला श्री. या. ना. पवनीकर, डॉ. य. खु. देशपांडे, श्री. द. रा. गोमकाळे आणि श्री. भी. गो. देशपांडे यांनी अनुमोदन दिल्यानंतर वि. सा. संघाचे अध्यक्ष डॉ. मा. गो. देशमुख हे रीतसर स्थानापन्न झाले व त्यांनी आपलें अध्यक्षीय भाषण केलें.

रात्री दहापासून निरनिराळ्या स्थानिक शाळांतर्फे "सांस्कृतिक कार्यक्रम" झाला आणि न्यू मॉडेल हायस्कूलतर्फे "देवमाणूस" या नाटकाचा प्रयोग होऊन पहिल्या दिवसाचा संमेलनाचा कार्यक्रम आटोपला.

रविवार दिनांक ५ फेब्रुवारी १९५०

सकाळी आचार्य श्री. मा. ज. कानेटकर यांचें " बुद्धिमंतांचें बुद्धिमांद्य, अर्थात् भारतावरील संकट नं. १ " यावर तासभर भाषण झालें.

दुपारी तीन वाजतां प्रतिनिधी निवासस्थानी विषयनियामक समितीची सभा होऊन खुल्या अधिवेशनांत मांडावयाचे ठराव निश्चित करण्यांत आले.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५० मार्च

संध्याकाळी ५ वाजतां 'ललित वाङ्मयांतील प्रभावी प्रकार' यावर परिसंवाद झाला. त्यांत खालील साहित्यिकांनी भाग घेतला—

नाटक—प्रा. वि. प्र. मोहगांवकर

कादंबरी—प्रा. कु. मनुताई नातू

लघुकथा—प्रा. वा. कृ. चोरघडे

लघुनिबंध—प्रा. श्री. ना. बनहट्टी

काव्य—प्रा. भ. श्री. पंडित आणि प्रा. भी. गो. देशपांडे.

वरील परिसंवाद आटोपल्यावर खुल्या अधिवेशनाला सुरवात झाली.

प्रथम अध्यक्षांच्या खास विनंतीवरून श्री. पु. य. उर्फ बाबासाहेब देशपांडे यांचें वि. सा. संघाच्या मंदिरयोजनेसंबंधी स्वतंत्र भाषण झालें. तदनंतर पुढील दहा ठराव सर्वानुमते मंजूर झाले—

ठराव १ ला —

विदर्भ साहित्य संघाचें १९४४ सालीं पुनरुज्जीवन झाल्यापासून संघाचे सरचिटणीस असलेले प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी यांच्या मोटर अपघातांत झालेल्या भयंकर निधनाबद्दल संमेलनाला अनिवार दुःख होत आहे. गेलीं पांचवर्षे ते संघाचे प्रमुख आधारस्तंभ होते, आणि संघाच्या आजवर झालेल्या प्रगतीत त्यांचा वाटा फार मोठा आहे. गोड व मनमिळाऊ स्वभावामुळे त्यांनी फार मोठा मित्रपरिवार संपादन केला होता. त्यांचें साहित्यप्रेम, नाट्यप्रेम, संगीतप्रेम वाखाणण्याजोगें होतें. त्यांच्या मृत्यूमुळे विदर्भ साहित्य संघाची तर अपरिमित हानी झालीच आहे; पण मराठी साहित्याचें व रंगभूमीचेंहि फार मोठें नुकसान झालें आहे. त्यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबियांना झालेल्या शोकामध्ये हें संमेलन सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गति देवो.

—अध्यक्षांकडून

ठराव २ रा —

गेल्या वर्षांत दिवंगत झालेल्या पुढे नमुद केलेल्या व्यक्तींनी लेखनद्वारा व इतर मार्गांनी मराठी भाषेमध्ये जें कार्य केलें त्याबद्दल या संमेलनास कृतज्ञता वाटत असून त्यांच्या अकालीं मृत्यूबद्दल अत्यंत खेद होत आहे. त्यांच्या कुटुंबीयांना होणाऱ्या शोकांत संमेलन सहभागी आहे.

१ कै. सौ. प्रमिलाबाई ओक

२ कै. केशवराव गजेंद्रगडकर

३ कै. सौ. प्रतिभाबाई वनमाली ('उन्नती'च्या महिला विभागाच्या संपादिका, वर्धा)

४ कै. भदे.

—अध्यक्षांकडून.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ठराव ३ रा —

शालेय पुस्तकें खेरीज करून इतर पुस्तकांच्या विक्रीवर मध्यप्रदेश सरकार-ने जो विक्रीवर लादला आहे तो ज्ञानप्रसाराला अडथळा आणणारा असल्यामुळे ताबडतोब रद्द करण्यात यावा अशी या संमेलनाची मागणी आहे. या संबंधाने सभा भरविणें, शिष्ट मंडळें नेणें वगैरे योग्य ते प्रयत्न कार्यकारी मंडळाने करावेत अशी संघाच्या कार्यकारी मंडळाला सूचना आहे.

सूचक—प्रा. मा. ल. व्यवहारे
अनुमोदक—श्री. रा. पु. सगदेव

ठराव ४ था —

मराठी भाषा आणि वाङ्मय यांविषयीं कार्य करणारी मध्यप्रदेशांतील विदर्भ साहित्य संघ हीच व्यापक आणि सर्व प्रातिनिधिक संस्था असल्या कारणाने तिचे प्रतिनिधि हायस्कूल बोर्ड आणि या बोर्डाची मराठी अभ्यासक्रम समिति यांच्यावर घेण्यांत यावे, अशी सरकारकडे मागणी आहे. या संबंधांत हायस्कूल एज्युकेशन कायद्यामध्ये योग्य त्या दुरुस्त्या सरकारने कायदेमंडळाच्या येत्या अधि-वेशनांत करून घ्याव्या.

सूचक—प्रा. श्री. ना. बनहट्टी
अनुमोदक—श्री. रा. या. कथडे

ठराव ५ वा —

नागपूर नभोवाणीवर मराठी कार्यक्रमांच्या सूचना मराठींतूनच घोषित झाल्या पाहिजेत आणि नभोवृत्त (Radio Report and Commentaries) हेंहि मराठींतूनच क्षेपित करण्यांत यावें.

सूचक—श्री. बळवंतराव अप्पलवार
अनुमोदक—प्रा. वा. कृ. चोरघडे

ठराव ६ वा —

जिल्हा व तहसील अथवा जनपद असे जे शासनाच्या सोयींसाठी विभाग पाडण्यांत आले आहेत, त्यांत अनेक जिल्ह्यांत व तहसील-जनपदांत हिंदी–मराठी भागांचा सरमिसळ झालेली दिसते व त्यामुळे हिंदी–मराठी सीमेच्या भागांत मराठी भाषिकांवर शैक्षणिक व इतर गोष्टींत अन्याय होतो. नव्या राज्यघटनेत हिंदी व मराठी या दोन्ही भाषांना राज्यभाषा (State Language) म्हणून मान्यता मिळाली आहे. अशा परिस्थितींत मध्यप्रदेशांतील कोणीहि मराठी भाषी लोक हिंदी बहुभाषी जिल्ह्यांत व तहसिल-जनपदांत समाविष्ट होणार नाहीत, अशा रीतीने जिल्ह्यांची व तहसिल–जनपदांची सीमा नव्याने निश्चित केली जावी अशी या संमेलनाची मध्यप्रदेश सरकारकडे मागणी आहे.

त्याचप्रमाणे बहुसंख्य मराठी भाषिक विभागांत मराठी प्राथमिक शाळा बंद करून हिंदीचें जें आक्रमण सुरु झालें आहे त्यालाहि बंदी करण्यांत यावी.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५०
मार्च

या संबंधी अवश्य ते प्रयत्न करण्यासाठी संघाध्यक्ष श्री. माडखोलकर व चिटणीस यांच्या खेरीज श्री. पु. य. देशपांडे, श्री. बाळासाहेब ढवळे, व श्री. ए. श्री. पटवर्धन (आमंत्रक) यांची एक समिति हें संमेलन नेमीत आहे. समितीला अधिक सभासद स्वीकृत करण्याचा अधिकार आहे.

सूचक—प्रा. श्री. ना. बनहट्टी.
अनुमोदक—श्री. रा. पु. सगदेव.

ठराव ७ वा —

सुमारे ७५ वर्षे सुरु असलेलें व वऱ्हाड जॉइंट बोर्डानें चालविलेलें "वऱ्हाड शाळा पत्रक" हें मासिक, प्रांतांत जानपद संस्था निर्माण झाल्यापासून बंद पडलें आहे. प्रांतांतील शैक्षणिक क्षेत्रांत अविरत कार्य करणारें हें ७५ वर्षांचें मासिक बंद पडल्याबद्दल या संमेलनास खेद वाटत आहे.

हें संमेलन अमरावती जनपदाला अशी विनंती करतें की त्यांनी वऱ्हाड शाळा पत्रक त्वरित सुरु करावें अथवा जी शिक्षणविषयक किंवा शिक्षकसंस्था तें मासिक चालविण्यास तयार असेल तिला तें चालविण्यास द्यावें, व हें मासिक सुरु होताच त्याला मिळत असलेली सरकारी ग्रँट सुरू करण्यांत यावी.

सूचक—प्रा. ग. त्र्यं. देशपांडे
अनुमोदक—श्री. शं. ना. सहस्त्रबुद्धे

ठराव ८ वा —

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध नाटककार, कवि व विनोदी लेखक कै. राम गणेश गडकरी याचें सावनेर येथे ज्या घरांत निधन झालें तें तेथील घर आपल्या ताब्यांत घेऊन, तेथे त्यांचें स्मारक करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. ही जागा मिळवून तेथे त्यांचें स्मारक उभारण्यासाठी सरकारनें विदर्भ साहित्य संघाला सर्व प्रकारे मदत करावी अशी त्यांना नम्र विनंती आहे.

या बाबतीत योग्य ती कारवाई करण्यासाठी पुढील समिति नेमण्यांत येत आहे—

१ प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे
२ प्रा. डॉ. वि. भि. कोलते
३ सौ. इंदुमती शेवडे
४ सौ. विमलाबाई देशपांडे
५ श्री. व. शा. वरखेडकर (आमंत्रक)

सूचक—श्री. द. रा. गोमकाळे
अनुमोदक—प्रा. कु. मनुताई नातू

ठराव ९ वा—

मोडी ही मराठीची शीघ्र लिपि असल्यानें तींत लिहिलेले हिशेब, दस्तैवज इत्यादि कागदपत्रांना सरकारी कोर्ट कचेऱ्यांत रीतसर मान्यता देण्यांत यावी अशी या संमेलनाची मध्यप्रदेश सरकारला विनंती आहे.

सूचक—डॉ. यादवराव श्रीहरी अणे
अनुमोदक—श्री. दे. गो. लांडगे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ठराव १० वा --

महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचें शुद्धलेखन सर्व क्रमिक पुस्तकांतून व वृत्तपत्र, नियतकालिकांतून तंतोतंत रीतीने पाळण्यांत यावें अशी हें संमेलन सर्वांना शिफारस करीत आहे.

सूचक---श्री. वामनराव आवळे
अनुमोदक---श्री. खर्चे.

ठराव मंजुरीनंतर अधिकारप्रदानाचा कार्यक्रम झाला. डॉ. मा. गो. देशमुख यांनी संघाचीं सूत्रें नवीन अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे स्वाधीन केलीं. श्री. माडखोलकर स्थानापन्न झाल्यावर त्यांचे हस्ते श्री. द. रा. गोमकाळे, डिस्ट्रिक्ट जज, मलकापूर यांचे विनंतीवरून श्री. मधुकर आष्टीकरकृत 'जग माझें आहे' या नाटकाचें प्रकाशन करण्यांत आलें.

यानंतर संमेलनाचे अध्यक्ष डॉ. मा. गो. देशमुख यांनी समारोपाचें भाषण केल्यावर नवीन अध्यक्ष श्री. माडखोलकर यांनी चांद्याच्या स्वागत मंडळाचे आणि श्री. यादवराव पवनीकर यांनी स्वागतमंडळातर्फे सर्व प्रतिनिधि व साहाय्यकर्ते यांचे आभार मानले.

तदनंतर नवीन कार्यकारी मंडळाची सभा होऊन खालील ठराव मंजूर करण्यांत आला —

"डॉ. माधवराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं गत वर्षी ज्या कार्यकारी मंडळाने संघकार्याची जबाबदारी पत्करली व तें कार्य उत्कृष्ट रीतीने पार पाडून संघाचें पाऊल प्रगतिपथावर पुढे टाकलें त्याबद्दल हें नवें कार्यकारी मंडळ कृतज्ञता व्यक्त करतें."

रात्रीं १०॥ वाजतां प्रथम काव्यगायनाचा कार्यक्रम झाला.

नंतर नाट्य निकुंज, नागपूर तर्फे 'कलेचा काळा बाजार' या नाटकाचा प्रयोग झाल्यावर चांदा येथील १२ वें संमेलन आटोपलें.

या संमेलनांतील स्वागताध्यक्ष, उद्घाटक, आणि अध्यक्ष यांच्या भाषणांतील कांहीं भाग व कविसंमेलनांतील कांहीं कविता नागपूर नभोवाणीने आलेखित करून ता. ६ रोजीं रात्री नागपूर केंद्रावरून ध्वनिक्षेपित केल्या.

प्रभानिवास, जेलरोड,
नागपूर नं. १०
ता. १७-२-१९५०

रा. पु. सगदेव,
चिटणीस,
वि. सा. संघ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(पान १०४ वरून चालू)

करूं इच्छितात." असा निर्वाळा दिला आहे तो कोणत्याहि बुद्धिवादी व्यक्तीला नाकारता येणार नाही. पण, कवीने आजच्या जगाचें चित्र कसें आहे त्याची कल्पना आपल्या प्रस्तावनेंत देतांना 'संघर्षा'च्या ज्या दृष्टिकोणांतून उल्लेख केला तो मात्र आम्हाला मान्य नाही. नवकवींची भूमिका आणि निश्चित स्थान हें केवळ एका ठराविक दिशेनेच गेलें पाहिजे असें नसून सर्वग्राही व सर्वव्यापि अशी त्यांची दिशा असावी असा आमचा कटाक्ष आहे. श्री. मुक्तिबोध आमच्या ह्या कटाक्षाशी बव्हंशीं सहमत असल्याचेंहि त्यांच्या प्रस्तावनेच्या उत्तरार्धावरून विशद होतें. तसें नसतें तर त्यांनी "समाजाचें निव्वळ चित्रण करूनच नव्हे तर त्याला बदलून, जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात ॥ या आदर्शाला वास्तविक जीवनांत मूर्त करावयाचें आहे" असा निग्रहाने उल्लेख केला नसता. इतकेंच नव्हे तर कवीला दीर्घ भूतकाळाचें स्मरण होऊन तो म्हणतो, "संत कवींनी साऱ्यांना एकत्र केलें. वैयक्तिक देवपूजेची, मोक्षाची परंपरा बाजूस सारून साऱ्यांना एकत्र गात, एकत्र नाचत, एकत्रच पढरीची वारी करावयास लावलें. आणि हेंच कार्य करण्यासाठी जन्ममरणाचे फेरे चुकविण्याचे सोडून तुकारामाने—तुका म्हणे गर्भवासीं, सुखें घालावें आम्हासी। अशी घोषणा केली. मराठीची महान् काव्य परंपरा त्या त्या काळाच्या संदर्भाने पुरोगामी आहे." कवीची नवकाव्या संबंधीची दूरवर पोंचलेली ही लक्षधारा जर सूक्ष्मतेने अवलोकिली तर 'नवकाव्य' ही काय चीज आहे हें सहज कळून येईल.

नवकाव्याचें आजचें खरें स्वरुप कसें असावें व त्यासाठी नवकवींची बैठक कोणत्या प्रकारची असावी या बाबतींत मात्र आम्ही कवीशी सहमत आहोंत.

'नवी मळवाट' ह्या काव्य-संग्रहांत एकूण ३१ कविता समाविष्ट करण्यांत आल्या आहेत. आशयाच्या दृष्टीने आम्ही ह्या संग्रहाचे तीन भाग पाडतों. पहिल्या भागांत १ ते १० कविता येत असून त्यांत सद्यःस्थितीवर विदारक प्रकाश पाडणारी समाजांतलि विविध तऱ्हेचीं चित्रें चित्रित करण्यांत आलीं आहेत. दुसऱ्या भागांत ११ ते २३ कविता येत असून त्यांत विशेषतः सौंदर्य आणि सामुहिक परिस्थितीचीं दृश्यें रंगविण्यांत आलीं आहेत. आणि तिसऱ्या भागांत २३ ते ३१ कविता असून यांत पहिल्या दोन्ही भागांचें स्वरूप, मतें आणि निष्कर्ष अगदी स्वच्छपणे दिग्दर्शित केले आहेत. आशय, प्रतिभा आणि प्रतिपादन यांचा बोधपूर्ण समन्वय घडवून आणण्यांत कवीचें कौशल्य आणि हातोटी किती सफाईची आहे याचा प्रत्येक छंदागणिक प्रत्यय येतो. डौलदार भाषा आणि अर्थसूचक शब्दयोजना मोठ्या दक्षतेने वापरण्यांत आल्याने, कांही ठिकाणीं हिंदीचें वळण भासूनहि काव्याला रतिभरहि वैगुण्य येत नाही. उलट तें, अधिक ओजस्वी नी अधिक उठावदार वाटतें. एकूण संपूर्ण कवितेची प्रकृति जितकी उग्र तितकीच गंभीर असल्यामुळे वाचकवृंद या काव्यांतून आपली सहज सुटका करून घेऊं शकत नाही. कांही कांही कविता तर इतक्या गूढ वाटतात की एकाचित्त होऊन शब्दांतील गर्भित अर्थ नीट उमगून घेतल्याशिवाय त्यांतील रसास्वाद चटकन् चाखतां येत नाही. पण एकदा का वाचक अर्थाच्या शोधार्थ गुंगला की मग त्याच्या बुद्धीला पौष्टिक खाद्य लाभून त्याचा आनंद द्विगुणित होतो इतका हा काव्य-संग्रह सहज चटका लावतो.

(अपूर्ण; पुढील अंकीं चालूं—)

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

☆

जोंपर्यंत देहाची आसक्ति आहे, भीति आहे तोंपर्यंत खरें रक्षण मिळणार नाही; तोंपर्यंत एकसारखी भीति राहील. जरा निजलों तर साप येऊन तर दंश नाही करणार, चोर येऊन माझा निकाल नाही करणार, असें वाटत राहील. मनुष्य उशाशी सोटा ठेवतो कशासाठी! तो म्हणतो, "जवळ पाहिजे. चोर चीर आला तर—" अरे भल्या माणसा, चोराने तो वडगा तुझ्या डोक्यांत घातला तर? चोर सोटा विसरून आला तर त्याच्यासाठी तूं आधीच तयार करून ठेवला आहेस. अरे कोणाच्या भरवशांवर तूं निजतोस? केवळ दुनियेच्या हातांत तूं त्यावेळेस असतोस. खुशाल तुला साप येऊन चावेल. तूं जागृत असलास तर बचाव करणार ना? झोपेंत तुझा बचाव कोण करणार? कोणी येऊन मानेवरून सुरी फिरवून दिली की लागला निकाल! मी कोणत्या तरी शक्तीवर विश्वास ठेवून निजतों. ज्या शक्तीवर वाघ, गाई इत्यादि सर्व निजतात, त्याच शक्तीवर विसंबून मीहि झोपतों. म्हणजे शेवटीं परमेश्वरावरच विश्वास टाकावा लागतो. वाघालासुद्धा झोप येते. सर्व जगाशीं ज्याने वैर बांधलें व हरघडी जो पाठीमागे बघतो असा सिंहहि झोपतो. त्या शक्तीवर विश्वास नसता तर कांही सिंहांनी निजावें, कांहींनी जागे राहून पाहरा करावा, अशी व्यवस्था त्यांना करावी लागली असती. ज्या शक्तीवर विश्वास ठेऊन क्रूर असे वृक, व्याघ्र, सिंहहि झोपतात, त्याच विश्वव्यापक शक्तीच्या मांडीवर मीहि निजलेला आहे. आईच्या अंकावर बालक सुखाने झोपतें. तें बालक त्यावेळेस जणूं दुनियेचा बादशहा असतें. ह्या विश्वंभर मातेच्या अंकावर तुम्ही आम्हीहि असेच प्रेमपूर्वक, विश्वासपूर्वक निजावें. जिच्या आधारावर माझें हें सारें जीवन आहे, त्या शक्तीचा मला अधिकाधिक परिचय करून घ्यावयाचा आहे. ती शक्ति अधिकाधिक मला प्रतीत झाली पाहिजे. ह्या शक्तीबद्दल मला जितकी खात्री पटेल, तितकें माझें रक्षण अधिक होईल. जसजसा ह्या शक्तीचा अनुभव येत जाईल, तसतसा विकास होत जाईल.

—विनोबा

पत्रव्यवहाराचा पत्ता :
युगवाणी कार्यालय, बजाजवार कॉलनी, धरमपेठ, नागपूर.

मुद्रक, प्रकाशक : प. वि. बेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ